

डॉ. सौ. स्वप्नाली
अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरड्यांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबड्यांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६



दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८२ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


## थोडक्यात...

### मुंबईच्या महापौर, उपमहापौरपदाची आज निवडणूक

मुंबई (समर्थ गांवकरी) : मुंबईचा महापौर आणि उपमहापौरपदासाठी मंगळवारी 11 फेब्रुवारी रोजी होत असून प्रतिस्पर्धी पक्षाकडून कुणीही या पदांसाठी उमेदवारी अर्ज न भरल्याने ही निवडणूक बिनविरोध घोषित झाली आहे. त्यामुळे या निवडणूक निकालाची औपचारिकता मंगळवारी पार पडणार आहे. तब्बल 44 वर्षांनंतर भाजपचा महापौर मुंबई महापालिकेत विराजमान होणार आहे. या निवडणुकीत महापालिका आयुक्त डॉ भूषण गगराणी हे पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. विशेष म्हणजे महापौर निवडीच्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमहापौर एकनाथ शिंदे हे स्वत: उपस्थित राहून याचि देही याची डोळा पाहून या क्षणाचे साक्षीदार होणार आहेत. मुंबई महापालिकेत भाजपचे सर्वाधिक म्हणजे 89 नगरसेवक निवडून आले असून महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेनेचे 29 अधिक राष्ट्रवादी काँग्रेसचे 4 अशाप्रकारे 33 नगरसेक आहेत. त्यामुळे भाजप शिवसेना महायुतीचे संख्याबळ हे 122 एवढे होत आहे. महायुतीच्यावतीने महापौरपदासाठी भाजप नगरसेविका रितू तावडे आणि उपमहापौरपदासाठी शिवसेनेचे संजय घाडी यांनी आपले उमेदवारी अर्ज महापालिका सचिव यांना सादर केले. परंतु उबाठाच्यावतीने कुणीही आपले अर्ज भरलेले नाहीत. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध होणार आहे.

### अमेरिकेविरुद्धच्या सामन्यात पाकिस्तानचा विजय

कोलंबो (समर्थ गांवकरी) : आयसीसी पुरुष टी ट्वेंटी वर्ल्डकपमधील अमेरिकेविरुद्धच्या साखळी सामन्यात पाकिस्तानचा 32 धावांनी विजय झाला. या सामन्यात नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेणे अमेरिकेला भोवले. प्रथम फलंदाजी करणाऱ्या पाकिस्तानने 20 षटकांत नऊ बाद 190 धावा केल्या. तर धावांचा पाठलाग करणाऱ्या अमेरिकेला 20 षटकांत 8 बाद 158 धावा एवढीच मजल मारता आली. पाकिस्तानकडून 41 चेंडूत पाच षटकार आणि सहा चौकार मारत 73 धावा करणारा साहिबजादा फरहान सामनावीर झाला. अमेरिकेकडून अँड्रीस गॉसने 13, शायन जहांगीरने 49, कर्णधार असलेल्या मोनंक पटेलने 3, मिलिंद कुमारने 29, शुभम रांजणेने 51, संजय कृष्णमूर्तीने शून्य, हरमीत सिंगने 6, मोहम्मद मोहसीनने शून्य, शॅडली व्हॅन शाल्कविकने नाबाद 1, एहसान आदिलने नाबाद 1 धावांचे योगदान दिले.

### कोस्टल रोडवर ऐकू येणार जय हो

मुंबई (समर्थ गांवकरी) : वाहतूक कोंडी विरहित, वेगवान आणि सुखकर प्रवासाची साक्ष ठरलेल्या मुंबईतील धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज किनारी मार्गावर (मुंबई कोस्टल रोड) वाहनचालकांसाठी एक आगळावेगळा आणि अभिमानाचा अनुभव देणारी अभिनव संगीत संकल्पना प्रत्यक्षात आली आहे. या रस्त्यावर विशेष तंत्रज्ञानयुक्त संगीत पट्टे बसविण्यात आले आहेत. या संगीत मार्गावरील (मेलोडी रोड) पट्ट्यांवरुन वाहन गेल्यावर स्लमडॉग मिलेनियर चित्रपटातील 'जय हो' हे गाणे ऐकू येणार आहे. हा जगातील पाचवा आणि भारतातील पहिलाच प्रयोग आहे. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार, 11 फेब्रुवारी 2026 रोजी दुपारी 12.30 वाजता या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ होणार आहे.

# अजितदादांचा घातपात झाला : रोहित पवार यांचा आरोप

## VSR विमान कंपनीसह कपूर नावाच्या पायलटवरही संशय व्यक्त

मुंबई : (समर्थ गांवकरी)



अजित पवारांच्या विमान घातपाताबाबत लोकांच्या मनामध्ये अनेक प्रश्न पडले आहेत. अजित दादांचा मृत्यू झाला यावर विश्वास बसत नव्हता. मात्र ही घटना सत्य आहे. आज अजितदादा आपल्यामध्ये नसले तरीसुद्धा विचाराने ते कायम आपल्या सोबत आहेत, असे म्हणत रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या अपघातावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या अपघाताबतचे सविस्तर प्रेसेंटेशन रोहित पवार यांनी सादर केले.

दादा परत आले तर मी त्यांना घट्ट मिठी मारेल, असे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. मात्र, आज अजित दादा आपल्यात नाही. आम्ही प्रयत्न करून आम्हाला ही सर्व माहिती मिळाली आहे. मग सरकारच्या एजन्सीने जर काम केलं, तर या अपघाताचे रहस्य लवकरात लवकर आपल्याला कळेल, असे म्हणत रोहित पवार यांनी अजितदादांचा घातपात झाल्याचा आरोप केला. तसेच VSR विमान कंपनीसह कपूर नावाच्या पायलटवरही संशय व्यक्त केला.

रोहित पवार यांनी अफवांमुळे निर्माण झालेल्या संभ्रमाबाबत बोलताना एक प्रसंग सांगितला. पिंपरी चिंचवडमध्ये सिग्नलला थांबले असताना एका रिक्षाचालकाने त्यांना विचारले की, 9 तारखेला तुम्ही अजितदादांबाबत काही सांगणार होता, त्याचं काय झालं? त्यावर रोहित पवार यांनी त्याला 10 तारखेला सर्व सांगणार असल्याचे उत्तर दिले. काही लोकांनी भावनिक होऊन दादा परत येतील असे व्हिडिओ टाकले, काहींनी विमानात सहा जण होते आणि दादांचे पार्थिव सापडले नाही असे सांगितले. या सर्व चर्चांमुळे लोकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. त्यामुळेच लोकांना सत्य कळावे, म्हणून ही पत्रकार परिषद घेतल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी रोहित पवार अत्यंत भावुक झाले. त्यांनी सांगितले की अपघातानंतर सलग सहा दिवस त्यांना हे सर्व एखाद्या वाईट स्वप्नासारखे वाटत होते. दादांचा अपघात झालाच नाही असे त्यांना सतत वाटत होते. मात्र, जेव्हा त्यांनी अपघातानंतर मिळालेल्या काही वस्तू प्रत्यक्ष पाहिल्या, तेव्हा वास्तव समोर आले. जळालेला स्वेटर, चप्पल आणि अजितदादांच्या हातातील घड्याळ त्यांनी पाहिले. दादा नेहमी घड्याळ 15 मिनिटे पुढे ठेवत असत. त्या घड्याळात 9 वाजलेले होते आणि ते पूर्णपणे बंद पडले होते. ते दृश्य पाहून त्यांना खात्री पटली की अजितदादा आता हयात नाहीत.

रोहित पवार यांनी सांगितले की, अजितदादांच्या प्रेमापोटी त्यांनी या अपघाताबाबत शक्य ती माहिती गोळा केली. काही जण विचारतील ही माहिती कुठून आणली, कशी आणली, परंतु दादांबद्दल असलेल्या जिव्हाळ्यामुळेच हा प्रयत्न केला. आम्ही सत्तेत नसतानाही जे जमेल ते करण्याचा प्रयत्न केला. दादा आणि साहेबांनी नेहमी एकच सांगितले, प्रयत्न करत राहा. त्याच विचारातून हा संपूर्ण तपशील समोर आणण्याचा प्रयत्न केला, असे त्यांनी स्पष्ट केले.

### दादांचा वेळ मुद्दाम वाया घालवला गेला का?

- रोहित पवार यांनी दावा केला की, अपघातापूर्वी काही घडामोडींमुळे दादांचा वेळ मुद्दाम वाया घालवला गेला का, याची चौकशी व्हावी. एका नेत्याच्या फाईलमुळे उशीर झाला, पक्षातील एका नेत्याची भेट उशिरा झाली, आणि त्यामुळे दुसऱ्या दिवशी विमान प्रवासाचा निर्णय घ्यावा लागला, यामागे काही नियोजन होते का, असा सवाल त्यांनी केला.
- विमान कंपनीच्या कार्यपद्धतीवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. कंपनीत चेकलिस्ट पद्धत नसणे, कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डर बंद असणे, मेंटेनन्समध्ये त्रुटी, पायलटांवर दबाव, स्टॉल वॉर्निंग सिस्टिम बंद असणे, दुसरा 'गो अराउंड' न घेणे, इंधन बचतीसाठी घाई करणे अशा बाबींची चौकशी व्हावी, अशी त्यांची मागणी आहे.
- या प्रकरणाची चौकशी केवळ स्थानिक संस्थांकडून नव्हे तर परदेशी तपास यंत्रणांकडूनही व्हावी, तसेच व्हीएसआर कंपनीच्या मालकावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी स्पष्ट मागणी रोहित पवार यांनी केली आहे. अपघातानंतरही या कंपनीच्या विमानातून मंत्री प्रवास करतात, ही बाब अधिक चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले.
- 'व्हीएसआर' कंपनीच्या विमानाला युरोपमध्ये बंदी आहे, पण भारतात काहीच कारवाई का केली नाही? 'व्हीएसआर' कंपनीच्या विमानाचा दोन वर्षांपूर्वी एक अपघात झाला होता. पण त्याचा पुढे काहीही तपास झाला नाही. दोन वर्षांपासून त्याचा रिपोर्ट आला नाही. तो रिपोर्ट दाबला का?
- 'व्हीएसआर' कंपनीच्या विमानात काय बिघाड झाला होता? ते खाली येताना एका बाजूला कलल्याचे दिसले, त्याचे कारण काय? विमानाचे रूटिन मेंटेनन्स झाले नव्हते का, ते कुणी केले होते, विमानाचा हँगर सीसीटीव्ही कुठेय, विमानाच्या हेव्ही मेंटेनन्स कधी झाला होता, त्याचा अहवाल कुठे आहे?
- विमानाचे मेकॅनिकल फेल्युअर झाले असेल काय? टेक ऑफ करण्यापूर्वी विमानाची पाहणी झाली होती का? विमानाचा टेकलॉग कुठे आहे? एअरवर्थी रिपोर्ट कुठे आहे?
- अजितदादांचा प्लॅन कुणी बदलवला का? ते बारामतीला कारने जाणार होते. पण एका नेत्याच्या सांगण्यावरून फाईलवर सही करण्यासाठी थांबले. त्याला उशीर झाला. तसेच त्यांच्या पक्षाचा एक नेता त्यांना भेटण्यासाठी उशिरा आला. त्यामुळे दादांनी विमानाने जायचे ठरवले.
- अजितदादांच्या विमानाने दुसरा गो अराऊंड का घेतला नाही? कंपनीने पायलटला इंधन वाचवण्याचे आदेश दिले होते का? कुणाच्याही जीवापेक्षा इंधन वाचवणे महत्त्वाचे होते का?

# तुमचा पक्ष 'मविआ'च्या व्हेंटीलेटरवर

## फक्त प्रक्षोभक भाषण करता येतात

मुंबई : (समर्थ गांवकरी)



- अमित साटमांचा राज ठाकरेंवर पलटवार
- सरसंघचालकांवर केली होती टीका

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मुंबईत कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात अनेक कलाकार मंडळी देखील उपस्थित होती. त्यात विशेष लक्ष वेधले गेले अभिनेता सलमान खानच्या उपस्थितीने. यावरून विरोधकांनी संघावर टीकेची झोड उठवली. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी देखील सरसंघचालक मोहन भागवत यांच्या भाषणावर तसेच त्यांनी केलेल्या मराठी भाषेच्या विधानावर ट्विट करत टीका केली होती. आता त्यांनी केलेल्या ट्विटला भाजप नेते अमित साटम यांनी भले मोठे ट्विट करत प्रत्युत्तर दिले आहे. अमित साटम यांनी सुरुवातीला संघाच्या प्रार्थनेच्या ओळी लिहीत राज ठाकरेंवार निशाणा साधण्यास सुरुवात केली. साटम म्हणाले, नमस्ते सदा वत्सले मातृभूमे, त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोऽहम्। महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे, पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते।। राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रार्थनेतील या ओळी संघाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांच्या ठायी असलेले देशप्रेम, मातृभूमीच्या रक्षणार्थ संघाच्या प्रत्येक कार्यकर्त्याने दिलेले समर्पण अधोरेखित करते. संघ उभा राहिला तोच मुळी देशाच्या,हिंदुत्वाच्या रक्षणासाठी, मानवतेसाठी त्यात कुठल्याही भाषेविरुद्ध, धर्माविरुद्ध आकस नव्हता. त्या उलट राज ठाकरे आपला पक्ष हा खूपच अल्पायुषी होता, आजही आहे. सध्या तो महाविकास आघाडी नामक व्हेंटीलेटरवर तग धरून आपले आयुष्य ढकलत आहे. तुम्हाला फक्त जनतेला प्रक्षोभक भाषण करून भाषावाद, प्रांतवादात अडकवून सामान्य जनतेची दिशाभूल करायची आहे. तरुणांना भडकावून समाजातील वातावरण पेटते ठेवायचे आहे पण त्यांच्या घरात पेटणाऱ्या चुलीबद्दल तुम्ही कधीच काहीच बोलत नाही, असे साटम म्हणाले.

पुढे अमित साटम म्हणाले, एक दिवस तुम्ही 'सत्याचा मोर्चा' नामक ढोंगी कार्यक्रमासाठी ट्रेन पकडायला दादर स्टेशनवर उभे राहिलात आणि ट्रेनमधली प्रचंड गर्दी पाहून तुम्हालाच घाम फुटला आणि तीच तुमची खरी ओळख आहे त्यात तुमचा काहीच दोष नाही तुम्ही फक्त प्रक्षोभक भाषणे केली, तरुणांची माथी भडकावून त्यांच्या मार्फत मारहाण घडवून आणली.

# २३ फेब्रुवारी पासून राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन

- कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय

मुंबई : (समर्थ गांवकरी)

राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज सोमवार दि. 23 फेब्रुवारी 2026 ते बुधवार दि. 25 मार्च 2026 पर्यत निश्चित करण्यात आले आहे. दिनांक 6 मार्च 2026 रोजी अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे, असा निर्णय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला. विधानभवन येथे आज विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. बैठकीला विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सांस्कृतिक कार्य मंत्री अँड.आशिष शेलार, आमदार सर्वश्री अनिल परब, प्रसाद लाड, भास्कर जाधव, जयंत पाटील, सुनील प्रभु, भाई जगताप, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सतेज पाटील, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री, राज्य उत्पादन शुल्क मंत्री दिवंगत अजित पवार यांना कामकाज सल्लागार समितीच्या दोन्ही बैठकीत श्रद्धांजली वाहण्यात आली. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहात शोक प्रस्ताव मांडण्यात येणार आहे. अधिवेशन काळात शनिवार दि. 28 फेब्रुवारी 2026 रोजी शासकीय सुट्टीच्या दिवशी विधिमंडळ कामकाज होणार आहे.

### या अधिवेशनात यावर होणार चर्चा

- संयुक्त राष्ट्र संघाने सन 2026 हे 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून घोषित केले आहे. या अधिवेशनात यावर चर्चा करण्यात येणार आहे.
- जागतिक महिला दिनानिमित्त दिनांक 9 मार्च रोजी दोन्ही सभागृहात महिला दिनानिमित्त चर्चा होणार आहे.
- मराठी भाषा गौरव दिननिमित्त चर्चा होईल.
- निवृत्त होणाऱ्या सदस्यांचा निरोप समारंभ होईल.



# १२ वीच्या परीक्षेसाठी निघालेल्या विद्यार्थ्यावर काळाचा घाला

मुंबई : (समर्थ गांवकरी)



महाराष्ट्रात आजपासून बारावी बोर्डाच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. मात्र, परीक्षेच्या पहिल्याच दिवशी पेपरसाठी निघालेल्या विद्यार्थ्यावर काळाने घाला घातल्याची घटना घडली आहे. डोंबिवली येथील रहिवासी असलेल्या सोहम कटरे या विद्यार्थ्याचा लोकल ट्रेनमधून पडून अपघाती मृत्यू झाला आहे. ही घटना कळवा-मुंब्रा रेल्वे स्थानकादारम्यान घडली असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवली येथील रहिवासी असलेला सोहम कटरे हा विद्यार्थी बारावीच्या पहिल्याच पेपरसाठी घरातून निघाला होता. त्याचे परीक्षा केंद्र कळवा येथील मनिषा विद्यालयात होते. नेहमीप्रमाणेच तो परीक्षेसाठी देखील लोकलनेच निघाला. मात्र सकाळच्या वेळेत लोकलमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होती. या गर्दीमुळे सोहमचा तोल गेला आणि तो चालत्या लोकलमधून खाली पडल्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेत सोहमचा जागीच मृत्यू झाल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला आणि पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली. बारावीच्या पहिल्याच पेपरच्या दिवशी दुर्दैवी घटना घडल्याने कटरे कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. तसेच परिसरातील नागरिकांनी देखील हळहळ व्यक्त केली आहे. या घटनेनंतर पुन्हा एकदा लोकल ट्रेन प्रवासाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# दावोसमधील ७५ टक्के करारांचे उद्योगात रूपांतर

## महाराष्ट्रात विक्रमी परकीय गुंतवणूक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची माहिती



मुंबई : (समर्थ गांवकरी)

देशातील सर्वात जास्त थेट परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात होत असते. मात्र आता ही गुंतवणूक देशात जास्तच नाही, तर रेकॉर्ड मोडणारी ठरत आहे. आर्थिक व्यवस्थेला उत्सवाचे स्वरूप दिल्यामुळेच उद्योगस्नेही वातावरण राज्यात तयार झाले आहे. यामुळेच महाराष्ट्रात 'रेकॉर्ड तोड' गुंतवणूक होत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. लोकसत्ता वृत्तपत्राच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले, स्वित्झर्लंड मधील दावोस येथे जागतिक अर्थ परिषदेत ३० लाख कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. तसेच १२ लाख कोटींचे करार अंतिम करण्यात आले आहे. या जागतिक परिषदेत परकीय गुंतवणूक असेल तेच करार करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यामुळे प्रत्येक करारातून राज्यात थेट परकीय गुंतवणूक येणार आहे. दावोस येथे महाराष्ट्राच्या दालनाला गुंतवणूकदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. तेथे १० राज्यांपैकी महाराष्ट्राचाच बोलबाला होता. या परिषदेत झालेल्या करारांचे प्रत्यक्षात उद्योगात रूपांतर होण्याचे राज्याचे प्रमाण ७५ टक्के आहे. राज्यात 'इज ऑफ डूइंग बिझनेस' करण्यासाठी' हंड्रेड रिफॉर्म्स इन टू मंथ' असा उपक्रम राबविण्यात येत आहे. विविध १०० सुधारणांनी उद्योगस्नेही वातावरण गुंतवणूकदारांना अधिकाधिक आकर्षित करणार आहे. तसेच मैत्री पोर्टलच्या माध्यमातून उद्योगांसाठी सिंगल विंडो सिस्टीम कार्यान्वित करण्यात आली आहे. राज्यात उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्यात येत आहे. राज्याच्या सर्व दूर भागात गुंतवणूक होत आहे. गडचिरोली 'स्टील सिटी ऑफ इंडिया' म्हणून समोर येत आहे. ऑटोमोबाईल उद्योगांमध्ये नागपूर नाव ठळकपणे पुढे आले आहे. महिंद्रा कंपनीने १५ हजार कोटींची गुंतवणूक नागपूर येथे केली आहे. या ठिकाणी भारताच्या इतिहासातील सर्वात मोठा ऑटोमोबाईल प्रकल्प महिंद्रा कंपनी उभारत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# लोढा-केसरकर कार्यालयांना कुलूप

मुंबई : (समर्थ गांवकरी)

मुंबई महापालिका मुख्यालयात गेल्या काही काळात झालेल्या राजकीय आणि प्रशासकीय घडामोडींना आता नवा वळण मिळाले आहे. नव्या महापौरांच्या कार्यकाळाची सुरुवात होताच, मुख्यालयातील शिक्षण समितीच्या कार्यालयात सुरू असलेले पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांचे दालन बंद करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.


शेती विकणे

लोणीगवळी येथील ७ + ७ =१४ एकर शेती एक विहीर व ५० टक्के दुसऱ्या विहीरीत हिस्सा आणी बंगल्यासह विकणे आहे.

संपर्क=९३७२६२३६१०

# बौद्ध विहार मंजुरीसाठी खा. लंके यांचा पाठपुरावा

- केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची भेट
- बौद्ध समाजाच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णयाचे आश्वासन



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

मतदारसंघातील बौद्ध समाजाच्या दीर्घकालीन धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक मागण्यांना न्याय मिळवून देण्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत मतदारसंघातील बौद्ध विहार मंजुरीच्या विषयावर सविस्तर, सकारात्मक आणि आशादायी चर्चा झाली.

मतदारसंघातील बौद्ध समाजाची लोकसंख्या, त्यांची श्रद्धा, धार्मिक परंपरा तसेच सांस्कृतिक जडणघडण लक्षात घेता स्वतंत्र आणि सुसज्ज बौद्ध विहार उभारणी ही अत्यंत आवश्यक व न्याय्य मागणी असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून दिले. बौद्ध विहार केवळ धार्मिक उपासनेचे केंद्र न राहता सामाजिक एकोपा, सांस्कृतिक संवर्धन, प्रबोधन आणि युवक-युवतींसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा मुद्दाही त्यांनी ठामपणे मांडला.

या विषयावर मा. रामदास आठवले यांनी सहानुभूतीपूर्वक भूमिका घेत प्रस्तावाचा सखोल विचार करून सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया, नियमांची पूर्तता आणि पुढील कार्यवाहीबाबत केंद्र शासनाच्या पातळीवर सहकार्य राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. या चर्चेमुळे बौद्ध समाजाच्या अपेक्षांना नवी दिशा मिळाल्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी खासदार नीलेश लंके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेचा उल्लेख करत समाजातील प्रत्येक घटकाला सन्मान, समता आणि विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हेच आपले राजकीय व सामाजिक ध्येय असल्याचे सांगितले. बौद्ध समाजाच्या धार्मिक व सामाजिक गरजांकडे केवळ मागणी म्हणून नव्हे, तर संविधानिक हक्काच्या दृष्टीने पाहिले पाहिजे, असा ठाम विचार त्यांनी मांडला. मतदारसंघातील पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक विकास या सर्व बाबींमध्ये समतोल साधत काम करण्याचा निर्धार खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केला. बौद्ध विहार मंजुरीसाठी केलेला हा पाठपुरावा हा त्याच व्यापक विकासदृष्टीचा भाग असून, येत्या काळात बौद्ध समाजाच्या उन्नतीसाठी आणखी ठोस पावले उचलली जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ही भेट आणि त्यातून झालेली सकारात्मक चर्चा बौद्ध समाजासाठी आश्वासक ठरणारी असून, लवकरच प्रत्यक्ष निर्णयाच्या दिशेने पावले पडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## सांगवी धरणातून शेतीसाठी रोटेशन पाणी सोडण्यास पालकमंत्र्यांचा हिरवा कंदील!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सांगवी धरणातून शेतकऱ्यांच्या मागणीनुसार शेतीसाठी रोटेशन पाणी सोडावे, या मागणीसाठी आज जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या श्रीमती सुनिताताई अशोकराव भांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने पालकमंत्री तथा राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली. या भेटीत शेतकऱ्यांनी सध्याच्या पिकांची स्थिती, पाण्याची तातडीची गरज आणि संभाव्य नुकसान याबाबत सविस्तर माहिती मंत्री महोदयांना दिली. सदर मागणीची दखल घेत नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगवी धरणातून शेतीसाठी रोटेशन पाणी सोडण्यास तत्त्वतः मान्यता देत हिरवा कंदील दाखवला, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी बबन सदगिर, गणपत देशमुख, अक्षय देशमुख, तुकाराम सदगिर, दीपक जगताप, राहुल देशमुख, भास्कर दराडे, आयुब शेख, बच्छाव एखंडे, बाबुराव घोडसरे, आप्पासाहेब देशमुख, सुनील दातीर, जयश्री देशमुख, अतुल पवार आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय झाल्याबद्दल उपस्थितांनी सुनिताताई भांगरे व पालकमंत्री विखे पाटील यांचे आभार व्यक्त केले.

## उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रशस्तीपत्र देऊन सन्मान

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



जिल्ह्यातील विविध गंभीर गुन्ह्यांवर प्रभावी कारवाई करून गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्याबद्दल अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार दशरथ कबाडी यांना राज्याचे अपर पोलीस महासंचालक (फोर्स वन, प्रशिक्षण व खास पथके) महाराष्ट्र राज्य, मुंबई येथील मा. श्री. कृष्ण प्रकाश यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

पोलीस निरीक्षक कबाडी यांनी खून, दरोडा, जबरी चोरी, चैनस्नॅचिंग, घरफोडी, चोरी, दरोड्याची तयारी, आर्म अ‍ॅक्ट, गोहत्या व प्राणीसंरक्षण कायदा, अवैध गुटखा, अवैध वाळू तसेच एनडीपीएससह विविध गुन्ह्यांवर कठोर कारवाई केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली खून प्रकरणांत ९ गुन्हे उघडकीस आणून २० आरोपींना अटक करण्यात आली. दरोडा प्रकरणातील ७ गुन्ह्यांत ३९ आरोपींना अटक, जबरी चोरीतील ११ गुन्ह्यांत ५५ आरोपी, चैनस्नॅचिंगच्या ६ गुन्ह्यांत १२ आरोपी, घरफोडीतील ५० गुन्ह्यांत ६० आरोपी आणि चोरीच्या ४४ गुन्ह्यांत ९० आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

याशिवाय दरोड्याची तयारी करणाऱ्या १५ आरोपींविरुद्ध ३ गुन्हे दाखल करण्यात आले. आर्म अ‍ॅक्ट अंतर्गत ११ गुन्ह्यांत १५ आरोपींना अटक करून त्यांच्याकडून १६ गावठी कट्टे व ३० जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. गोमांस व गोहत्या प्रकरणांत २४ गुन्ह्यांत ८० आरोपी, अवैध गुटखा प्रकरणांत ३५ गुन्ह्यांत ६१ आरोपी, अवैध वाळू प्रकरणांत १६ गुन्ह्यांत ३० आरोपी तर एनडीपीएस अंतर्गत ४ गुन्ह्यांत १४ आरोपींवर कारवाई करण्यात आली.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मा. कृष्ण प्रकाश यांनी कबाडी यांचे कौतुक करत प्रशस्तीपत्र प्रदान केले. यावेळी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, श्रीरामपूर अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनीही कबाडी यांच्या कार्याचे अभिनंदन केले.

## विविध धार्मिक कार्यक्रम

**किनवट तालुका : (समर्थ गांवकरी)**

संत श्री गजानन महाराज यांच्या १४८ व्या प्रकट दिनानिमित्त किनवट शहरात भक्तीमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रकट दिनानिमित्त संत गजानन महाराज मंदिरातून पारंपरिक पायदळ पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या पालखीत भाविक सहभागी झाले होते. टाळ-मृदंग, भजन, हरिनामाच्या गजरात पालखी शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. पालखी मार्गावर विविध ठिकाणी आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. पालखी मंदिरात परतल्यानंतर महाआरती, महानैवेद्य व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

## पशु कल्याणासारख्या पवित्र कार्यासाठी श्रीमद् भागवत सप्ताह

### ठाण्यात कृष्णजन्म महोत्सव भक्तिभावात साजरा!

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



परम दयाळू भगवान श्रीकृष्णाच्या असीम कृपेने, आझादनगर, ब्रह्मांड, ठाणे येथील सीपीसीए पशुवैद्यकीय रुग्णालयात श्रीकृष्णजन्म महोत्सवानिमित्त पशु कल्याणाच्या पवित्र उद्देशाने आयोजित श्रीमद् भागवत सप्ताह भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमास समाजरत्न श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, श्री जिग्नेशभाई जयेशभाई जोशी महाराज, नगरसेवक श्री लहू पाटील, श्री निमेशभाई शहा, श्री पांडुरंग पाटील, सौ. शकुंतला मजुमदार, डॉ. सुहास राणे, श्री देबासीस मजुमदार, सौ. ममता गिरथ, श्री मुकेश गिरी, श्री राजेश तलरेजा, सौ. प्राची मोटा, श्री सुरेश वीरजीभाई ठक्कर, श्रीमती मीरा सुरेश ठक्कर, श्री कृष्णा श्री नामदार राही, श्री कांतीलाल बोराडे, श्री राजेंद्र पुराणि, श्री राजेंद्र पांडेजी, सौ. अमिता परेश ठक्कर, श्रीमती किम जितेंद्र ठक्कर यांच्यासह अनेक मान्यवर व कर्मचारी उपस्थित होते. तसेच ठक्कर परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित भाविकांच्या भक्तिभावामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. यावेळी नानजीभाई ठक्कर म्हणाले, "कृष्णाचा जन्म ही केवळ एक ऐतिहासिक घटना नाही, तर तो जीवनासाठी दिलेला संदेश आहे. जीवन कितीही अंधकारमय असले तरी भक्तीचा दिवा प्रज्वलित ठेवा—देव नक्कीच मार्ग दाखवतो. जेव्हा धर्म कमी होतो आणि अधर्म वाढतो, तेव्हा मी अवतरतो, असे भगवान श्रीकृष्ण सांगतात." तर श्री जिग्नेशभाई जयेशभाई जोशी महाराज आपल्या प्रवचनात म्हणाले,

"कृष्णाचा जन्म तुरुंगात झाला, यामागे खोल अर्थ आहे. जेव्हा मन वासना, क्रोध, लोभ आणि अहंकाराच्या बंधनात अडकते, तेव्हा भक्ती, ज्ञान आणि प्रेमाचा प्रकाश आत्म्यात अवतरतो—आणि त्या क्षणीच कृष्णाचा जन्म होतो." कृष्णजन्माष्टमी माणसाला आत्मशुद्धी व आंतरिक मुक्तीचा मार्ग दाखवते, असा संदेश या सप्ताहातून देण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# पत्रकारिता राजकीय व्यवस्थेची दिशा ठरविते : पद्मश्री पोपटराव पवार

## पारनेर तालुक्यातील निघोज येथे अहिल्यानगर जिल्हास्तरीय पत्रकार अधिवेशन

### ज्येष्ठ पत्रकार व पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्तात्रय उनवणे यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित




ग्रामीण भागात पत्रकारिता करत असताना अडचणी येतात अशा पत्रकारांना मदत करणे हेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे काम आहे. पारनेर तालुक्यातील निघोज सारख्या ग्रामीण भागात ४० वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात काम करणारे ज्येष्ठ पत्रकार दत्ता उनवणे यांचे कार्य कौतुकास्पद आहे अशा पत्रकारांचा सन्मान होणे गरजेचे आहे. पत्रकारिता ही नेहमी समाज उपयोगी असावी. राज्यातील पत्रकारांना न्याय देण्यासाठी नेहमीच आक्रमक भूमिका मांडत राहणार आहे.

**- विश्वासराव आरोटे (सचिव, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई)**

### पत्रकारिता म्हणजे थँक लेस जॉब : शिवाजीराव शिर्के

पत्रकारिता हा जॉब म्हणजे थैंकलेस जॉब आहे शंभर बातम्या जरी चांगल्या लिहिल्या आणि एक ओळ विरोधात छापून आली तरी त्या शंभर चांगल्या बातम्यांवर पाणी फेरल जातं ज्याच्याबद्दल शंभर बातम्या चांगल्या छापल्या ती मंडळी मग नंतर बोट मोडायला तयार असतात आणि नाव ठेवतात. असे परखड मत जेष्ठ पत्रकार शिवाजीराव शिर्के यांनी जिल्हास्तरीय पत्रकार अधिवेशनात आपले मत व्यक्त केले.

### सोशल मीडियाच्या काळातही ग्रामीण भागातील पत्रकारिता टिकून

सोशल मीडियाच्या काळात सुद्धा ग्रामीण भागातील पत्रकारिता आजही टिकून आहे शहरी भागातील पत्रकारितेपेक्षा ग्रामीण भागातील पत्रकारितेला आजही चांगली दिवस आहे आणि उद्याही राहतील गेल्या काही वर्षापासून नवीन पत्रकार तयार व्हायला तयार नाहीत. सारख्या ग्रामीण भागात गेल्या 40 वर्षापासून पत्रकारिता करत असलेले दत्तात्रय उनवणे हे आमचे कुटुंबातील सदस्य आहेत यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने जीवन गौरव देऊन गौरव करण्यात आला त्या संघटनेतील सर्वांचे आभार व्यक्त करतो. असे मत ज्येष्ठ पत्रकार संपादक शिवाजी शिर्के यांनी व्यक्त केले.

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पत्रकारिता करत असताना जरी टीकाटिप्पणी होत असली तरी सामाजिक प्रभावीपणे व निर्भीडपणे आपल्याला काही गोष्टीची मांडणी केली नाही तर राजकीय व्यवस्था त्या दिशेने जात नाही हे लक्षात ठेवा शेवटी राजकीय व्यवस्थेला सामाजिक आणि राष्ट्रीय समस्येकडे घेऊन जायचे असले तर निर्भीड पत्रकारिता सुद्धा खूप महत्त्वाची आहे. असे परखड मत हिवरे बाजारचे कार्यक्षम सरपंच पद्मश्री पोपटराव पवार यांनी व्यक्त केले पारनेर तालुक्यातील निघोज येथे जिल्हास्तरीय पत्रकार अधिवेशन आयोजित करण्यात आले होते यावेळी पद्मश्री पवार बोलत होते.

पारनेर तालुक्यातील निघोज येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्हास्तरीय पत्रकार अधिवेशन व राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा व पदाधिकारी सन्मान सोहळा सोमवार दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पद्मश्री पोपटराव पवार, ज्येष्ठ पत्रकार शिवाजीराव शिर्के व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे महासचिव विश्वासराव आरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.

यावेळी गेल्या ४० वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात सामाजिक बांधिलकी जपत काम करणारे पारनेर तालुक्यातील जुने जाणते ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय उनवणे यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सहपत्नीक सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात पुढे बोलताना पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले पारनेर तालुक्यातील पत्रकारांनी पत्रकारितेला एक चांगले व्यासपीठ तयार केले असून राळेगणसिद्धी व अण्णा हजारे यांची सामाजिक चळवळ पुढे घेऊन जाण्यासाठी पत्रकारांचे मोठे योगदान आहे. कोरोना काळात व संकट काळात सुद्धा पारनेर तालुक्यातील पत्रकारांनी आधार देण्याचे काम केले आहे. काम करत असताना प्रत्येक क्षेत्रामध्ये टार्गेट केले जाते परंतु यासाठी आपण आपले काम थांबवता कामा नये निर्भीड पत्रकारिता व निर्भीड लेखणीही अत्यंत महत्त्वाची आहे. ज्येष्ठ पत्रकार शिवाजी शिर्के यांचा जिल्ह्यात व राज्यात पत्रकारिता क्षेत्रात दबदबा असून हरेश्वर देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून ते धार्मिक कार्यात पण सक्रिय आहेत. लेखणीच्या सामर्थ्यावर एक पत्रकार कशी दिशा बदलू शकतो हे हरेश्वर देवस्थानच्या माध्यमातून लक्षात येते असे म्हणत ज्येष्ठ पत्रकार शिवाजीराव शिर्के सर यांचे कौतुक पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले.

या जिल्हास्तरीय पत्रकार अधिवेशन कार्यक्रमाला पद्मश्री पोपटराव पवार, ज्येष्ठ पत्रकार शिवाजीराव शिर्के, यांच्यासह महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे महासचिव विश्वास आरोटे, कन्हैया दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष उद्योजक मच्छिंद्र लंके, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष तथा बाबासाहेब कवाद ग्रामविकास सेवाभावी संस्थेचे चेअरमन वसंत कवाद सर, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपाध्यक्ष तथा मळगंगा कंट्रक्शन कंपनीचे अध्यक्ष अमृता रसाळ, ट्रस्टचे कोषाध्यक्ष रामदास वरखडे, नित्यसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा माजी पंचायत समिती सदस्य डॉ. भास्करराव शिरोळे, राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकज कारखिले, माजी सरपंच चंद्रकांत लामखडे, माजी सरपंच ठकाराम लंके, किशन कन्हैयाचे दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष शिवाजी लंके, मुलिका देवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सहदेव आहेर, मुलिका देवी विद्यालयाचे प्राचार्य अंकुश अवघडे, शिक्षक सहकारी बँकेचे संचालक कारभारी बाबर, कपिलेश्वर उद्योग समूहाचे अध्यक्ष सोमनाथ वरखडे, निघोज सोसायटीचे माजी चेअरमन अनंतराव वरखडे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गणपत देठे, गभावना साळवे, ग्रामपंचायत सदस्या शबनूर इनामदार, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त शंकरराव लामखडे संतोष रसाळ,

भाऊसाहेब वाकचौरे,पारनेर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय शेरकर, विनोद गोळे, श्रीगोंदा तालुका पत्रकार संघाचे माजी तालुकाध्यक्ष पिटर रणसिंग, श्रीगोंदा तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी आप्पासाहेब चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद, दिलीपराव वराळ, बाजीराव झावरे, डॉ.अशोकराव सरोदे, डॉ.अजित लंके, सेवानिवृत्त प्राचार्य तथा पसायदान या धार्मिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामचंद्र महाराज सुपेकर,

सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाळासाहेब निचीत, सेवानिवृत्त मुख्याध्यापक अशोकराव ठुबे, इलेक्ट्रॉनिक मिडिया जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे , आपला गणपती सामाजिक प्रतिष्ठान अध्यक्ष रविंद्र रणसिंग, अ‍ॅड गणेश लाळगे, आदी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी पत्रकार गणेश जगदाळे, राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्ह्याचे माजी कार्याध्यक्ष अनिल चौधरी, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे, पत्रकार जयदीप कारखिले, पत्रकार सागर आतकर,प्रेस फोटोग्राफर व आपला तालुका न्यूज चॅनलचे संपादक जयसिंग हरेल, पत्रकार योगेश खाडे, पत्रकार आनंद भुकन, पत्रकार अविनाश भांबरे, पत्रकार विनोद साळवे, पत्रकार संदीप गाडे, पत्रकार संपत वैरागर , अर्जुन वैरागर, आपला गणपती सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष रविशेठ रणसिंग, पत्रकार संघाचे सल्लागार अ‍ॅड.गणेश लाळगे, जीएस महानगर बँकेचे राहुल उनवणे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे व्यवस्थापक महेश ढवळे, पत्रकार व उपव्यवस्थापक रोहन उनवणे , राजू वराळ, सुनिल लंके आदींनी परिश्रम घेतले, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवव्याख्याते प्रा.ज्ञानेश्वर कवाद , मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अनिल लंके यांनी केले.

कन्हैया दूध उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष शांताराम मामा लंके यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा कन्हैया रत्न व कन्हैया भुषन व रोख अडीच हजार रुपये हे पुरस्कार पारनेर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय शेरकर व राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्ह्याचे माजी कार्याध्यक्ष अनिल चौधरी यांना पद्मश्री पोपटराव पवार, नगर सह्याद्रीचे संपादक शिवाजीराव शिर्के व कन्हैयाचे अध्यक्ष उद्योजक मच्छिंद्र लंके यांच्या हस्ते देण्यात आला. या पुरस्कार निवड समीतीचे सदस्य म्हणून उद्योगपती सुरेश पठारे व नगर सह्याद्रीचे ज्येष्ठ पत्रकार दत्ता उनवने यांनी जाहीर केले होते. दरवर्षी हे पुरस्कार व रोख रक्कम देण्यात येणार आहेत.

राज्य मराठी पत्रकार संघाच्या या जिल्हा स्तरावरील अधिवेशनाला विशेष करुण कन्हैया दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष मच्छिंद्रशेठ लंके, नित्यसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा माजी पंचायत समितीचे सदस्य डॉक्टर भास्करराव शिरोळे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद सर, उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकजदादा कारखिले, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे ज्येष्ठ मार्गदर्शक सुनिल दादा पवार, किशन कन्हैया दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष शिवाजीराव लंके यांनी विशेष सहकार्य केले आहे. त्याबद्दल राज्य मराठी पत्रकार संघाचे महासचिव विश्वास आरोटे यांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

# शासनमान्य दारू दुकानावर धडक कारवाई

- बनावट दारूचे मोठे रॅकेट उघड!
- अकोले तालुक्यासह संगमनेर व सिन्नर तालुक्यात मोठ्या प्रमाणात बनावट दारूचा पुरवठा याच दुकानातून होतो!



**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नाशिक जिल्ह्यातील नांदूर शिंगोटे येथे असलेल्या शासनमान्य देशी दारू दुकानावर उत्पादन शुल्क विभाग व पोलिसांनी संयुक्तपणे धडक कारवाई करत बनावट दारूचे मोठे रॅकेट उघडकीस आणले आहे. याच दुकानातून अकोले तालुक्यासह संगमनेर व सिन्नर तालुक्यात मोठ्या प्रमाणात बनावट दारूचा पुरवठा केला जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या बनावट दारूमुळे आतापर्यंत सुमारे 100 ते 150 जणांचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त केला जात असून, अकोले तालुका या पुरवठ्यात आघाडीवर असल्याचे निष्पन्न झाले आहे. शासनमान्य परवाना असतानाही या दुकानात देशी दारूच्या नावाखाली बनावट दारू तयार करून विक्री केली जात होती.

उत्पादन शुल्क विभाग, नाशिक यांना या दुकानाबाबत ठोस माहिती व टीप प्राप्त झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. यापूर्वीही या दुकानावर कारवाई झाली होती, मात्र काही दिवसांतच पुन्हा दुकान सुरू केले जात असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

स्थानिक ग्रामस्थ व महिलांकडून या दुकानाविरोधात अनेकवेळा निवेदने देण्यात आली होती. मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप होत आहे. सकाळी सहा वाजल्यापासून रात्री बारा वाजेपर्यंत या दुकानात मोठा हैदोस सुरू असून, तळीरामांच्या त्रासामुळे परिसरात अपघात, भांडणे व महिलांना मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे ही बनावट दारू अकोले तालुक्यातील इंदोरी फाटा, समशेपुर फाटा, विरगाव फाटा, कोतुळ, ब्राम्हणवाडा, तसेच संगमनेर तालुक्यात मोठ्या प्रमाणात वाहतूक केली जात होती. ही वाहतूक ॲम्ब्युलन्स व दूध वाहतूक गाड्यांमधून होत असल्याची गंभीर माहिती समोर आली असून, यामुळे सिन्नर तालुका बदनाम करण्याचा डाव असल्याचा आरोपही केला जात आहे.

दैनिक समर्थ गांवकरी नेटवर्क यांनी गेल्या दोन-तीन दिवसांपूर्वी अकोले तालुक्यात बनावट दारू नाशिक–सिन्नर परिसरातून येत असल्याचे वृत्त प्रसिद्ध केले होते. या वृत्ताची दखल घेत प्रशासनाने पुन्हा एकदा कारवाई करत हे रॅकेट उघड केले आहे. या पार्श्वभूमीवर सदर दुकान कायमस्वरूपी बंद करण्यात यावे, तसेच कारवाई करताना "जखम गुडघ्याला आणि मलम शेंड्याला" लावू नये, अशी जोरदार मागणी ग्रामस्थ व सामाजिक संघटनांकडून केली जात आहे.

# एमआयटी-एडीटी विद्यापीठ व अपोलो हेल्थकेअर अकादमीमध्ये सामंजस्य करार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

## अलाईड हेल्थ सायन्सेस पदवी अभ्यासक्रमाला सुरुवात

अलाईड हेल्थ सायन्सेसमधील पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी MIT-ADT University आणि Apollo Healthcare Academy यांच्यात सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे. भारतासह जागतिक स्तरावर अलाईड हेल्थ क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची वाढती गरज लक्षात घेऊन ही भागीदारी महत्त्वाची मानली जात आहे. या सहकार्यामुळे एमआयटी-एडीटी विद्यापीठाच्या आधुनिक शैक्षणिक सुविधा आणि अपोलो हेल्थकेअर अकादमीचे क्लिनिकल कौशल्य यांचा समन्वय साधून विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार पदवी अभ्यासक्रम राबवले जाणार आहेत. या अभ्यासक्रमांमध्ये शैक्षणिक शिक्षणाबरोबरच रुग्णालयातील प्रत्यक्ष प्रशिक्षणाचा समावेश असेल. ॲनेस्थेसिया व ऑपरेशन थिएटर टेक्नॉलॉजी, मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी, क्रिटिकल केअर टेक्नॉलॉजी आदी उच्च मागणी असलेल्या शाखांवर विशेष भर दिला जाणार आहे. नॅशनल कमिशन फॉर अलाईड अँड हेल्थकेअर प्रोफेशनल्स (NCAHP) च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार करण्यात आलेले हे अभ्यासक्रम राष्ट्रीय नियामक निकषांशी सुसंगत असतील. विद्यार्थ्यांना अपोलो हॉस्पिटल्स आणि संलग्न आरोग्यसेवा केंद्रांमध्ये संरचित क्लिनिकल रोटेशन आणि अंतिम वर्षात इंटर्नशिपची संधी उपलब्ध होईल, ज्यामुळे त्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळेल. जागतिक आरोग्य संघटना (WHO) च्या अंदाजानुसार, जगभरात अलाईड हेल्थ व्यावसायिकांची कमतरता वाढत असून वृद्ध लोकसंख्या आणि आरोग्यसेवेची वाढती मागणी यामुळे ही तूट अधिक जाणवणार आहे. या पार्श्वभूमीवर कुशल, आत्मविश्वासू आणि कामासाठी सज्ज पदवीधर घडवण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. अपोलो नॉलेजचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवरामकृष्णन व्यंकटेश्वरन यांनी सांगितले की, वर्गातील शिक्षण आणि रुग्णालयातील प्रत्यक्ष सराव यातील दरी कमी करण्यासाठी ही भागीदारी उपयुक्त ठरेल. विद्यार्थ्यांना भारताबरोबरच आंतरराष्ट्रीय स्तरावरही करिअरच्या संधी मिळाव्यात, यासाठी आवश्यक कौशल्ये आणि अनुभव देण्याचा प्रयत्न केला जाईल.

# ग्रामस्वराज्य परिवर्तन जनसंवाद यात्रा



**राजूर : (समर्थ गांवकरी)**

क्रांतिकारी आदिवासी युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य के ए ग्रुप १२१७ अकोले तालुका संघटनेच्या माध्यमातून ग्रामस्वराज्य परिवर्तन जनसंवाद यात्रा आयोजीत करण्यात आली. महादेववाडी, सोमलवाडी, कोहणे ,तळे-कोथळे, विहीर, घोटी , वाघदरी,पिंपरी,शिळवंडी या गावांमध्ये जाऊन लोकांमध्ये मतदार साक्षरता वाढवण्यासाठी जनजागृती दौरा करण्यात आला.

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी कोणत्या मुद्द्यावर मतदान करावे यासाठी जनतेसोबत जनसंवाद केला आहे. हा जनसंवाद करत असताना अनेक ग्रामस्थांनी त्यांच्या अडचणी सांगितल्या.कुठेही शाश्वत विकासाची धोरणे नाही.ज्या गोष्टीतून आर्थिक व्यवहार होतो त्या गोष्टींवर जोर दिला जातो. यातून कोणत्याही प्रकारचा रोजगार आमच्या मुलांना उपलब्ध होणार नाही.अशा भावना व्यक्त करताना अनेक महिला तसेच गावकऱ्यांनी त्यांच्या व्यथा मांडल्या.

आश्रम शाळेतील विद्यार्थी ,जिल्हा परिषद चे विद्यार्थी काही ठिकाणी ठीकठाक तर काही ठिकाणी अत्यंत खराब इन्फ्रास्ट्रक्चर आहे,असे विद्यार्थ्यांनी आणि ग्रामस्थांनी सांगितले आहे. तसेच नवीन बिल्डिंग झाल्या पाहिजे. या भागामध्ये बऱ्याच शेतकऱ्यांनी सांगितले की आम्हाला बागायती शेतीसाठी सुविधा उपलब्ध नाही. आम्हाला सुविधा उपलब्ध करून द्या.

लोकप्रतिनिधी यांनी आता जनतेला गृहीत धरू नये, पक्ष आणि चिन्ह पाहणार नाही , फक्त समाजाप्रती काम बघणार असे येणाऱ्या निवडणूक मध्ये लोकप्रतिनिधीना दाखवून देऊ. जनतेने निवडूक हाती घेतलीय,या भावना जनतेने व्यक्त केल्या.

# रावेर परिक्षा केंद्रालगत फिरणाऱ्या विरुद्ध रावेर पोलिसांची संक्रांत

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

रावेर पोलीस स्टेशन तर्फे आज बारावीच्या परीक्षा असताना चोख बंदोबस्त लावण्यात आला होता . तसेच त्यादरम्यान विनाकारण परीक्षा केंद्राजवळ फिरणारे, व आरडाओरड करून शांतता भंग करणाऱ्या तीन जनाविरुद्ध मुंबई पोलीस कायदा कलम 110, 112, 117 नुसार कार्यवाहीकरण्यात आली आहे . त्यामुळे , विनाकारणा फिरणाऱ्यांचे धाबे दणानले असून , पुढेही परीक्षेदरम्यान विनाकारण फिरणाऱ्यांवर कारवाई केली जाईल असे सुत्रांनी सांगितले. तसेच शांतता भंगकरणाऱ्या लोकांवर सुद्धा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

# गडकोट किल्ल्यांचे जतन आणि संवर्धन काळाची गरज

- गिर्यारोहक केशव भांगरे
- ॲड. एम.एन. देशमुख महाविद्यालयात ऐतिहासीक वारसा स्थळांचे जतन व संवर्धन जिल्हास्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन संपन्न.



**राजूर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील गडकोट आणि किल्ले हे आपल्या महाराष्ट्राचे वैभव आहे. या गडकोट किल्ल्यांनीच अनादि काळापासून आपल्या स्वराज्याचे आणि आपल्या मुलखाचे संरक्षण केले आहे. त्या संरक्षणात गड कोट किल्ल्यांची भूमिका खूप महत्त्वाची होती. म्हणून हे सर्व जतन आणि संवर्धन करून ठेवणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन इडिया बुक ऑफ रेकॉर्ड, तेलंगणा बुक ऑफ रेकॉर्ड गिनीज वर्ल्ड-बुक आणि लंडन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद झालेल्या, 114 गड-किल्ले सर केलेल्या दिव्यांग गिर्यारोहक केशव भांगरे यांनी केले. ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ आणि ॲड. एम. एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राजूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'ऐतिहासिक वारसा स्थळांचे जतन व संवर्धन' या दोन दिवशीय जिल्हास्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. गड आणि कोट ऐतिहासिक स्थळे ही जतन व संवर्धन सुद्धा करणे हे आपले सर्वांचेच कर्तव्य आहे असेही ते म्हणाले. या कार्यशाळेचे उद्घाटन राजूर येथील दुय्यम न्यायाधीश सचिन निहारकर यांच्या शुभ हस्ते झाले. त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि शुभेच्छा दिल्या. कळसुबाई हरिचंद्र वनक्षेत्रपाल अधिकारी दत्तात्रय पडवळे यांनी ऐतिहासिक स्थळांचे जतन करण्यामध्ये वनस्पती, प्राणी, पशु, पक्षी आणि निसर्ग कशी भूमिका बजावतात हे चित्रफिती द्वारे स्पष्ट केले. यावेळी गिर्यारोहक अश्विनी बांबळे, प्रविण इदे आणि योगेश काळे यांनी ऐतिहासिक स्थळांचे जतन करताना गिर्यारोहक हा महत्त्वाचा घटक आहे. हे करत असताना मानसिक तयारी बरोबरच आपली शारीरिक तयारी सुद्धा असावी लागते. असे मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. वाय. देशमुख यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, उद्देश व स्वरूप विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. वाल्मिक गिते यांनी सागितले.सूत्रसंचालन प्रा. गणेश कुसमुडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी संगमनेर अकोले तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

# अगस्ती महाविद्यालयात बारावी बोर्ड परिक्षा सुरळीत सुरू

- पाहिल्या दिवशी विदयार्थी स्वागताने इंग्रजी विषयाचा पेपर पार पडला



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

विदयार्थ्यांच्या जीवनाला कलाटनी देणारे वर्ष म्हणजे इयत्ता बारावीची बोर्ड परिक्षा असते.त्यातच बोर्ड परिक्षेचा पहिलाच इंग्रजी पेपर म्हणजे विद्यार्थ्यांना खुपच टेन्शन निर्माण होते.विद्यार्थ्यांनी टेन्शनमुक्त वातावरणात पेपर लिहिला पाहिजे, त्यांच्या डोक्यावरील भार काहीसा हलका करण्यासाठी अगस्ती कला,वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय अकोले केंद्र क्र. २७१ येथे पहिल्या दिवशी विद्यार्थी स्वागताने इंग्रजी विषयाच्या पेपरची सुरुवात करण्यात आली. येशील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भास्कर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच केंद्रप्रमुख उपप्राचार्य चांगदेव डोंगरे व पर्यवेक्षक प्रा. विवेक वाकचौरे यांच्या सुत्रबद्ध नियोजनानुसार त्याचप्रमाणे केंद्रप्रमुख विजय भांगरे यांच्या नियंत्रणाखाली बारावी बोर्ड परिक्षा सुरळीत सुरू झाली आहे.

यावेळी परिरक्षक प्रा. सचिन लगड, प्रबंधक सिताराम बगाड,सुपरवायझर प्रा.सचिन चासकर,प्रा.महेश पाडेकर,प्रा. गंगाराम साबळे,प्रा.बाळासाहेब गोर्डे,प्रा.सोपान कोरडे,प्रा. सुनिल साबळे,प्रा.हरीश कुसळकर,प्रा. संतोष वावळे, प्रा. संदीप नवले,संतोष आवारी, प्रा. बनेश सावंत, प्रा. किरण नेहे, प्रा. संतोष अवचिते,वसंत जेडगुले यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. परिक्षेला जाण्यापुर्वी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे बुके देऊन केलेले स्वागत निश्चितच विद्यार्थी व पालकांसाठी प्रेरणादायी आहे.

> तुमचा सखोल अभ्यास, मेहनत आणि आत्मविश्वास तुम्हाला नक्कीच घवघवीत यश मिळवून देईल. घाबरून न जाता शांत डोक्याने पेपर लिहा. सकारात्मक राहा आणि स्वतःवर विश्वास ठेवा. "सर्वोत्कृष्ट कामगिरी करा, यश तुमचेच आहे. "अभ्यासाची मेहनत आणि कष्टाने यश मिळवा. परीक्षेसाठी खूप खूप शुभेच्छा.
> **- केंद्रप्रमुख विजय भांगरे**

> परीक्षेची भीती नको, स्वतःवर विश्वास ठेवा.लक्ष केंद्रीत करा. स्वतःवर विश्वास ठेवा. तुम्ही कठीण परिश्रम केले आहेत, आता फक्त ते सिद्ध करण्याची वेळ आहे. शांततेत पेपर सोडवा. तुमचा आत्मविश्वासच तुमची खरी ताकद आहे.घवघवीत यश मिळवा..उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा. **-केंद्र संचालक प्रा.चांगदेव डोंगरे**

# भेदभाव न करण्याचे निवेदन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे ठरविलेले आहे.शेतकऱ्यांनी विविध कार्यकारी सेवा सोसायटी तसेच बँकाकडून शेतीसाठी घेतलेले कर्ज माफ करण्याचे शासनाचे धोरण नक्कीच स्तुत्य आहे. कर्जमाफी केल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक उभारी येईल तसेच शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य येऊन ते पुन्हा नव्या जोमाने शेती करून अन्नधान्याच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ करतील. यापूर्वी झालेल्या कर्जमाफीमध्ये थकबाकीदार शेतकऱ्यांची थकबाकीची संपूर्ण रक्कम माफ करण्यात आली. मात्र नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान रूपाने थोडीशी रक्कम दिली गेली ही बाब नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय करणारी आहे.

# ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात ठाणे जिल्हा परिषदेचा राज्यात ३ रा क्रमांक

## संकेतस्थळ सुधारणा – नागरिककेंद्री व सुरक्षित डिजिटल पायाभूत सुविधा

ठाणे जिल्हा परिषद

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील विविध शासकीय कार्यालयांच्या कामकाजाचे मूल्यमापन करण्यात आले असून, जिल्हा परिषद ठाणे यांनी राज्यात तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हा परिषद ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संपूर्ण अधिकारी-कर्मचारी वर्गाचे अभिनंदन केले आहे. लवकरच राज्य शासनातर्फे सर्व विजेत्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

या मूल्यमापनात कार्यालयाची अधिकृत संकेतस्थळ व्यवस्था, 'आपले सरकार' प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअप चॅटबॉट, AI व Blockchain तंत्रज्ञानाचा वापर तसेच GIS प्रणालीचा प्रभावी वापर या सात महत्त्वाच्या निकषांवर जिल्हा परिषद ठाणे यांनी उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे. डिजिटल प्रशासनाच्या दिशेने टाकलेले हे पाऊल जिल्हा परिषद ठाणेच्या नाविन्यपूर्ण दृष्टिकोनाची साक्ष देणारे ठरले आहे. मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सुरू असलेल्या या कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद ठाणेच्या अधिकृत संकेतस्थळावर व्यापक आणि नागरिकाभिमुख सुधारणा राबविण्यात आल्या. शासकीय सेवा पारदर्शक, सुलभ, सुरक्षित व सर्वांसाठी सहज उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

# समतानगर, बोरीवली व भादाणे शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात !

## शासनाच्या धोरणालाच हरताळ; शिक्षकांअभावी जिल्हा परिषद शाळांतील शिक्षण व्यवस्थेची दुरवस्था

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत किमान दोन शिक्षक असावेत, असे स्पष्ट शासन धोरण असताना भिवंडी तालुक्यातील पडघा केंद्रातील समतानगर (बोरीवली) आणि भादाणे जिल्हा परिषद मराठी शाळांमध्ये या धोरणाचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे चित्र आहे. पहिली ते चौथीपर्यंत चार वर्ग असूनही केवळ एकाच शिक्षकावर संपूर्ण शाळा चालवली जात असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शिक्षकांच्या तीव्र कमतरतेमुळे या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर थेट परिणाम होत असून त्यांच्या शैक्षणिक भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही




स्थिती ओढावल्याचा आरोप पालक व सामाजिक संस्थांकडून केला जात आहे. समतानगर (बोरीवली) जिल्हा परिषद शाळेत ३१ विद्यार्थ्यांसाठी केवळ एकच शिक्षक, तर भादाणे शाळेत २४ विद्यार्थ्यांसाठी एकच शिक्षक कार्यरत आहे. पहिली ते चौथीपर्यंतच्या वर्गांसाठी तब्बल १४ विषयांचे अध्यापन, सर्व वर्गांचा अभ्यासक्रम पूर्ण करणे, शालेय पोषण आहाराची व्यवस्था, ऑनलाइन रेकॉर्ड भरणे, माहिती संकलन, उपक्रम राबवणे, प्रशासकीय व बँकेची कामे, सभा, प्रशिक्षण, निवडणूक कामकाज (बी एल.ओ) अशी असंख्य जबाबदाऱ्या एकट्या शिक्षकावर टाकण्यात आल्या आहेत. "एकटा शिक्षक ही सारी कामे कशी पार पाडणार?" असा सवाल आता शिक्षकांपासून पालकांपर्यंत उपस्थित केला जात आहे. या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधत लोकधारा प्रतिष्ठानचे

> "भिवंडी तालुक्यात सुमारे १७० शिक्षक, पदवीधर शिक्षक व मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत. दर महिन्याला दोन-तीन शिक्षक सेवानिवृत्त होत आहेत. सन २०१२ पासून शासनाकडून नियमित शिक्षक भरती झालेली नाही. तालुका बहुतांशी नॉन-पेसा क्षेत्रात असल्याने ३०८ जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता आहे,"
> **-गटशिक्षण अधिकारी संजय असावले**

> एकच शिक्षक—तोच शिकवतो, तोच मुख्याध्यापक, तोच शिपाई, तोच बी.एल.ओ. एक व्यक्ती, अनेक भूमिका ! अशा परिस्थितीतही शाळेचा पट का वाढत नाही, असा दोष शिक्षकांनाच दिला जातो.
> **-भादाणे शाळा मुख्याध्यापिका प्रियंका पवार**

अध्यक्ष मिलिंद जाधव यांनी शिक्षक विभागाला दुसऱ्यांदा निवेदन देत पडघा केंद्रातील शाळांमध्ये तातडीने शिक्षक नेमण्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे, याआधीही वर्षभरापूर्वी शिक्षक उपलब्ध करून देण्यासाठी निवेदन देण्यात आले होते. समतानगर येथील नागरिकांनीही स्वतंत्रपणे प्रशासनाकडे मागणी केली होती. मात्र, आजही या शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता कायम असल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी आहे. पडघा केंद्रातील ज्या शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता आहे, त्या शाळांमध्ये शिक्षकांची संख्या वाढविण्यात येणार का? की विद्यार्थ्यांचे भवितव्य असेच धोक्यात राहणार? असा थेट सवाल आता पालक, शिक्षक व सामाजिक संघटनांकडून उपस्थित केला जात आहे. शासन व शिक्षण विभाग यावर कधी ठोस निर्णय घेणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**अगस्ति सहकारी साखर कारखाना लि, अगस्तिनगर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

ग्राम- अगस्तिसाखर, अकोले Email-agastisakhar@rediffmail.com
फोन नंबर- (०२४२४) २२२७७५/२९७१२६
जा.क्रं. अगस्ति/३७/शेतकी/२४७९/२०२५-२६ दि.१०/०२/२०२६

**जाहीर नोटीस**

कारखाना कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील सर्व ऊस उत्पादक सभासद व बिगर सभासद बंधूना कळविण्यात येते की, आपले कारखान्याचा सन २०२५-२६ चा गाळप हंगाम दि.२०/०२/२०२६ चे दरम्यान बंद होत आहे. तरी ज्या सभासद किंवा ऊस उत्पादकांचा नोंद /करार केलेला ऊस तोडणी अभावी शेतात शिल्लक राहीला असेल अशा सर्व ऊस उत्पादकांनी कारखान्याचे सबंधित शेतकी गट कार्यालय किंवा शेतकी विभागातील मुख्य कार्यालय येथे त्वरीत संपर्क साधून ऊस तोडणी वाहतूक यंत्रणेमार्फत अथवा खाजगी स्वंतत्र ऊस तोडणी यंत्रणेमार्फत ऊस गाळपास पाठविण्याची व्यवस्था करावी. ज्याचा ऊस कमी वाढलेला असेल त्यांनी व ज्यांना स्वतःचे जबाबदारीवर स्वच्छेने ऊस कॅरिओव्हर (पुढील गळीतासाठी) ठेवायचा आहे. त्यांनी कारखान्याचे शेतकी कार्यालयात तसे कळवावे.

वरील प्रकारची व्यवस्था आपल्याकडून मुदतीत न झाल्यास व त्यामुळे आपला ऊस शेतात उभा राहील्यास त्याच्या नुकसानीची जबाबदारी कारखान्यावर राहाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| (सुधिर कापडणीस) | (श्रीमती सुनिताताई भांगरे) | (सिताराम पा. गायकर) |
| कार्यकारी संचालक | व्हा. चेअरमन | चेअरमन |

# 9 लाखांहून अधिक किमतीचा विदेशी दारूचा साठा जप्त

**डांग: (समर्थ गांवकरी)**




डांग जिल्ह्यातील बेकायदेशीर हालचाली आणि प्रोहिबिशन गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस यंत्रणा ॲक्शन मोडमध्ये दिसून येत आहे. डांग जिल्हा पोलीस अधीक्षक पूजा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सापुतारा पोलिसांनी सीमावर्ती चेकपोस्टवर सुरक्षा व्यवस्था अधिक कडक केली आहे. दरम्यान, १० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ६:०० वाजता, सापुतारा पोलीस चेकपोस्टवर कर्तव्यावर असलेले पोलीस सब-इन्स्पेक्टर बी. बी. पाटील, ए.एस.आय. संजयभाई भोये आणि त्यांच्या पथकाकडून वाहन तपासणी सुरू होती. यावेळी महाराष्ट्राकडून गुजरातमध्ये प्रवेश करणारा पांढऱ्या रंगाचा अशोक लेलँड टेम्पो (क्र. GJ-01-JT-5880) संशयावरून थांबवण्यात आला.

प्राथमिक तपासणीत काहीही संशयास्पद आढळले नाही. मात्र, सखोल तपासणीदरम्यान टेम्पोच्या मागील बॉडी भागात वर आणि खाली अशा दोन्ही बाजूंनी अत्यंत चलाखीने तयार केलेले 'चोरखाने' (गुप्त कप्पे) आढळून आले. हे कप्पे उघडताच पोलिसांनाही धक्का बसला. त्यामध्ये भारतीय बनावटीच्या इंग्लिश दारूच्या व्हिस्कीच्या बाटल्या आणि प्लास्टिक क्वार्टरचा मोठा साठा लपवण्यात आला होता.

पोलिसांनी घटनास्थळावरून एकूण ३४३२ बाटल्या (६३१.४४ लिटर) जप्त केल्या असून, त्यांची बाजारभावानुसार किंमत सुमारे ₹५,४१,६८० आहे. याशिवाय ₹३.५० लाखांचा टेम्पो, ₹१५,००० रोख रक्कम आणि मोबाईल फोन असा एकूण ₹९,१७,६८० किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.

या प्रकरणात टेम्पो चालक हितेशभाई भीमजीभाई बाभणिया (वय ३२, रा. मुंबई; मूळ रा. प्रागपरा, ता. रापर, जि. कच्छ) याला रंगेहाथ अटक करण्यात आली आहे. चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली असून, हा दारूचा साठा महाराष्ट्रातील चेंबूर येथे राहणाऱ्या प्रदीप चौधरी याने भरून दिला होता आणि तो कच्छमधील रापर येथे पोहोचवायचा होता.

सध्या सापुतारा पोलिसांनी अटक आरोपीसह माल पाठवणाऱ्या फरार आरोपीविरोधात प्रोहिबिशन कायद्यान्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास वेगाने सुरू केला आहे.




दैनिक लोकपत्रच्या ३६ व्या वर्धापन दिनानिमित्त नांदेड येथे डॉ दिलीप पुंडे यांच्या सर्पदंश दहा हजाराच्या वर रुग्णांना जीवनदान दिले असून त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना मराठवाडा भूषण या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्राचे माजी शिक्षण मंत्री तथा लोकपत्रचे मुख्य संपादक कमलकिशोर कदम, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार, कार्यकारी संपादक रवींद्र तहकीक, आणि आवृत्ती संपादक डॉ गणेश जोशी. डॉ. दिलीप पुंडे यांच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करून त्यांना मराठवाडा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

## थोडक्यात बातम्या...



### महामार्ग प्राधिकरण व संबंधित विभागांच्या दुर्लक्षामुळे खड्ड्यांचे साम्राज्य

डांग (स. गांवकरी) : डांग जिल्ह्याचे एकमेव गिरीमथक सापुताराला जिल्हा मुख्यालय आहवाशी जोडणारा राष्ट्रीय महामार्ग सध्या अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. 'महामार्ग' म्हणून ओळखला जाणारा हा रस्ता आता अक्षरशः खड्ड्यांचा मार्ग बनला असून, वाहनचालकांसाठी तो डोकेदुखी ठरत आहे. सापुतारापासून सामगहाण–गलकुड मार्ग आहवा पर्यंतच्या सुमारे ४० किलोमीटर लांबीच्या या मार्गावर ठिकठिकाणी डांबरीकरण उखडून मोठमोठे खड्डे पडले आहेत. सामगहाण ते जाखाणा, धुमखल, गलकुड, ल्हाणचर्या, टाकलीपाडा, उमरपाडा तसेच बोरखल ते आहवा शिवघाट परिसरात रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. अनेक ठिकाणी डांबर पूर्णपणे निघून गेल्याने खड्ड्यांवर खड्डे दिसून येत आहेत. विशेषतः पावसाळ्यानंतर या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांची खोली लक्षात येत नाही, परिणामी अपघातांची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अलीकडील काळात लहान-मोठ्या अपघातांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे चित्र आहे. स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की महामार्ग प्राधिकरण व संबंधित विभागांच्या निष्काळजीपणामुळे रस्त्याची नियमित दुरुस्ती केली जात नाही. अनेक वेळा तक्रारी व निवेदने देऊनही केवळ कागदोपत्री कारवाई होत असल्याची चर्चा आहे. नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला हा मार्ग आज त्रासदायक ठरला असताना, जबाबदार यंत्रणेला मात्र या गंभीर प्रश्नाचे काहीही देणेघेणे नसल्याचे दिसून येत आहे.



### लेण्याद्री येथे सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर वैद्यकीय मदत कक्ष संपन्न

शिवनेरी (स. गांवकरी) : लेण्याद्री येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर वैद्यकीय मदत कक्ष सुरू करण्यात आले. या मदत कक्षामध्ये गेले १० दिवस प्राथमिक आरोग्य केंद्र शिरोली बुद्रुक येथील कर्मचारी व आशा वर्कर निवडणूक कामासाठी उपस्थित असलेले पोलीस अधिकारी सर्व पोलीस स्टॉप कर्मचारी शासकीय सर्व अधिकारी, कर्मचारी, होमगार्ड मदतनीस सर्व उमेदवार व नागरिकांना आरोग्य सेवा देत सर्व तपासण्या व गोळ्या देण्यात आल्या . या कालावधीत शुगर , दमा , ताप, सर्दी-खोकला, रक्तदाब, मधुमेह तपासणी तसेच प्राथमिक उपचार अशा विविध आरोग्य सेवा पुरविण्यात आल्या आहेत . सोमवार दिनांक ९ पर्यंत सुमारे बहुसंख्य शासकीय अधिकारी व नागरिकांना आरोग्य सेवा देण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान उमेदवारी फॉर्म भरणे पासून मतमोजणी निकालापर्यंत कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ वैद्यकीय मदत तातडीने उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हा वैद्यकीय मदत कक्ष कार्यरत ठेवण्यात आला.

### शिरसाटवाडी फाटा ते गाव रस्ता मंजूर करण्यासाठी प्रयत्नशील : अविनाश पालवे



पाथर्डी (स. गांवकरी) : तालुक्यातील शिरसाटवाडी गावाचा मुख्य रस्ता अत्यंत खराब झाला असून रस्त्यांवर पडलेले खड्डे यामुळे गावातील नागरिक त्रस्त आहेत. फाटा ते गाव रस्त्यासाठी ग्रामविकास खात्याला पत्र व्यवहार केला असून मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांनी या रस्त्यासाठी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना पत्र देखील दिलेले असून या रस्त्यासाठी लवकरच निधी आणून हा रस्ता करणार असल्याचे मनसे जिल्हाध्यक्ष तथा सरपंच अविनाश पालवे यांनी म्हटले आहे. शिरसाटवाडी गावामध्ये ग्रामपंचायतीची स्थापना १९८७ साली झाली, परंतु गेल्या ३५ वर्षात गावामध्ये विकासाची कामे झाली नसल्याने पालवे सरपंच झाल्यानंतर शिरसाटवाडी गावामध्ये अगदी शून्यापासून सुरुवात करत रस्ते, लाईट, भूमिगत गटारे, स्ट्रीट लाईट, सिंगल फेज, पुल, सभामंडप, वीज ट्रांसफार्मर इत्यादी विविध पायाभूत सुविधांची निर्मिती त्यांनी केली असून गावातील जनतेचे कुठलेही काम असो ते सांगण्यासाठी व करण्यासाठी हक्काचा माणूस अविनाश पालवे यांच्या रूपाने उपलब्ध झाला आहे.

# १९ वा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात संपन्न

**मल्लखांब, कराटे व समूहनृत्यांतून विद्यार्थ्यांचा सामाजिक संदेश; विविध क्षेत्रांत प्राविण्य मिळवणाऱ्यांचा सन्मान**

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**




भिवंडी तालुक्यातील पडघे येथील आर. के. पालवी विद्यामंदिर इंग्रजी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचा १९ वा वार्षिक स्नेहसंमेलन शनिवारी व रविवारी सायंकाळी बालाजीनगर, नगर पडघे येथील भव्य मैदानात मोठ्या उत्साहात पार पडला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व प्राचार्य रवींद्र पालवी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक व क्रीडाप्रात्यक्षिकांद्वारे उपस्थितांची मने जिंकली. स्नेहसंमेलनात भारतीय सांस्कृतिक वारसा जतन करणारी नृत्ये, तसेच प्राचीन भारतीय क्रीडा प्रकार असलेल्या मल्लखांबाचे थरारक सादरीकरण करण्यात आले. लाकडी खांबावर व दोरीवर हवेत योगासने, कसरती व कुस्तीचे डाव दाखवत विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांकडून जोरदार दाद मिळवली. यासोबतच शारीरिक क्षमता, शिस्त व स्वसंरक्षण तंत्रांचे दर्शन घडवणारी कराटे कौशल्यांची प्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली. मोबाईलचे दुष्परिणाम, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, भारतीय सैनिकांचे शौर्य, शेतकऱ्यांचे जीवन, पंढरीची वारी, अपघात जनजागृती आणि मैत्रीचा संदेश अशा विविध विषयांवर आधारित समूहनृत्यांतून विद्यार्थ्यांनी प्रभावी सामाजिक संदेश दिला. पहिली ते दहावी तसेच अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील कार्यक्रम सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली.

यावेळी संस्थेची उभारणी करताना आलेल्या अडचणी व संघर्षांविषयी संस्थापक रवींद्र पालवी यांनी मनोगत व्यक्त केले. वर्षभरात विविध क्षेत्रांत प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला, तसेच उत्कृष्ट पालक म्हणून काही पालकांनाही गौरविण्यात आले. कार्यक्रमाला शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी पालवी विद्यामंदिर इंग्रजी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

# श्रावणीची एन्ड्युरन्स स्केटिंग स्पर्धेसाठी निवड

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



ठाणे जिल्ह्यातील वासिंद पूर्वेतील न्यू आयडियल इंग्लिश स्कूल येथे इयत्ता सहावी मध्ये शिकणारी आणि टीम आदि स्केटिंग क्लब, टिटवाळा येथे प्रशिक्षण घेणारी कु. श्रावणी तुषार सावंत हिने पुणे येथे झालेल्या एन्ड्युरन्स राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत मोठे यश संपादन केले आहे .महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना श्रावणीने या राष्ट्रीय स्पर्धेत तीन कांस्यपदके पटकावून राज्यासह ठाणे जिल्ह्याचे नावलौकिक केले आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे तिची 2026 मध्ये होणाऱ्या एन्ड्युरन्स जागतिक आंतरराष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी देशभरातून 15 राज्यांमधील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. कठीण स्पर्धा आणि प्रतिस्पर्ध्यांमध्येही श्रावणीने आपल्या मेहनती, चिकाटी आणि कौशल्याच्या जोरावर उत्कृष्ट कामगिरी करत यश मिळवले. तिच्या या कामगिरीबद्दल कोच आदित्य निकाळजी सर, शाळा प्रशासन, शिक्षक, पालक व अन्य प्रशिक्षक तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. श्रावणीच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यास प्रेरणा मिळत आहे.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत वैद्यकीय उपचार केंद्र सुरु

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



दिवा शहरात सांची न्युरोपॅथी ॲक्युपंक्चर व धडाकेबाज युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत वैद्यकीय उपचार उपक्रम सुरु झाला आहे. हा उपक्रम समाजसेवेच्या दृष्टीने अत्यंत कौतुकास्पद आहे. या उपक्रमांतर्गत न्युरोपॅथी व ॲक्युपंक्चर तज्ज्ञ डॉ. प्रमोद जाधव यांच्या माध्यमातून हाडे-सांधे व मज्जासंस्थेवरील उपचार पूर्णपणे मोफत सुरु झाले आहेत. या उपचारांमध्ये अर्धांगवायू, तीव्र गुडघेदुखी, सायटिका, कंबरदुखी (लंबर स्पॉन्डायलोसिस) व मानदुखी (सर्व्हायकल स्पॉन्डायलोसिस) कंबरदुखी, नस दाबणे, पाठ दुखणे, मणक्याचे आजार, सांध्यांची झीज, गुडघे दुखी, खांदा दुखणे, फ्रोजन शोल्डर, संधिवात, हात-पायाला मुंग्या येणे, लकवा, मुळव्याध, मधुमेह, गॅसत्रिक, वजन वाढणे / कमी होणे, स्त्रियांचे सर्व आजार, चेहऱ्यावरील डाग, वंध्यत्व, पोटाचे विकार, थायरॉईड, हार्ट, लिव्हर, किडनी, त्वचा, नेत्र, कान, नाक, घसा विकार अशा आजारांवर प्रभावी उपचार करण्यात येत आहेत. सर्व उपचार नैसर्गिक पद्धतीने, औषधांशिवाय, कोणतेही साईड इफेक्ट न होता सुरक्षितरीत्या केले जात आहेत. हा उपक्रम दररोज सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत चालू असून १० फेब्रुवारी २०२६ ते २०३० या कालावधीत दीर्घकालीन स्वरूपात राबविण्यात येणार आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमोल केंद्रे, सौ अश्विनी अमोल केंद्रे, कार्याध्यक्ष अभयलाल दुबे, उपसचिव राजूप्रसाद गुप्ता, उपखजिनदार अनिल मौर्या , प्रियेश धाडवे, रणजीत मौर्या यांनी डॉ प्रमोद जाधव यांचे अभिनंदन व सत्कार करून आज पासून जेष्ठ नागरिकांच्या उपचारास शुभारंभ सुरू केला.

# व्यवस्थेला दोष देत बसण्यापेक्षा परीस्थिती बदला - मीनल संचिती

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



कोणतीही परिस्थिती बदलायची असेल तर त्यासाठी तुम्हाला मेहनत करावी लागेल, आपल्या सभोवतालची सिस्टीम, व्यवस्था खराब आहे त्याला दोष देऊन उपयोग नाही. नियमित अभ्यास आणि मेहनत यामुळे तुमची परिस्थिती बदलते असा सल्ला ठाणे महापालिका उपायुक्त मीनल संचिती यानी एका कार्यक्रमात दिला. ठाणे महापालिका व रोटरी क्लबच्या वतीने आयोजित केलेल्या एसी, रेफ्रिजरेटर, वॉटर कुलर या उपकरणांच्या दुरुस्तीचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्याना पदवीप्रदान कार्यक्रमात त्या बोलत होत्या. नौपाडा येथील पालिका शाळा क्र १९ येथील रोटरी सेंटर मध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

ठाणे महानगरपालिका, रोटरी क्लब ऑफ लेक सिटी, रोटरी क्लब ऑफ ग्रीन सिटी, रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ व ब्लू स्टार कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक १९, विष्णुनगर, ठाणे (प) येथे स्किल डेव्हलपमेंट सेंटर सुरू करण्यात आलेले आहे. पहिल्या टप्प्यात ११ मुलानी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. तीन महिन्याचे हे प्रशिक्षण असून ते मोफत आहे. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थीना नोकरी व व्यवसायसाठी देखील रोटरीतर्फे सहकार्य केले जाते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डिस्ट्रिक्ट ३१४२चे प्रांतपाल हर्ष माकोल, प्रमुख पाहुणे म्हणून ठाणे पालिकेच्या शिक्षण उपआयुक्त मिताली संचेती, ठाणे महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी बढे सर, ब्लू स्टार ट्रेनिंग सेंटरचे मॅनेजर हरीश हे उपस्थित होते. तसेच यावेळी नियोजित प्रांतपाल चंद्रहास शेट्टी, माझी प्रांतपाल डॉक्टर मोहन चंदावरकर, रोटरी क्लब ऑफ ग्रीन सिटीचे अध्यक्ष सुरेश कल्याणकर, रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थच्या अध्यक्षा श्रीमती ममता वंजानी, जगदीश चेलारमानी, प्रशांत पात्रो, मेधा जोशी, देवयानी वेद, सुनील सोमण, राजेश परांजपे, नियोजित अध्यक्ष निशा कपीला, यतीन कोळंबेकर आणि अनेक रोटेरियन्स उपस्थित होते. यावेळी ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण उपायुक्त श्रीमती मिताली संचेती यांनी पूर्ण सेंटरची पाहणी करून सर्व उपक्रमाची माहिती घेतली आणि त्या आपल्या मनोगतात म्हणाल्या की रोटरीने हा चालू केलेला उपक्रम हा एक अभिनव असा उपक्रम असून याच्यात रोटरी विद्यार्थ्यांना पूर्णपणे अती उच्च प्रतीच्या साधन सामुग्रीसह प्रशिक्षण देतच आहेत तसेच त्यांनी त्यांना रोजगार निर्मितीचे पण साधन निर्माण करून दिलेला आहे. यावेळी त्या म्हणाल्या की या उपक्रमाचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना फायदा मिळण्यासाठी त्या ठाणे महानगरपालिकेतर्फे सर्वतोपरी मदत करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

# "प्रयोषा प्रतिष्ठान" संचलित मालेगाम शाळेत भावस्पर्शी 'मातृ-पितृ वंदना' भव्य कार्यक्रम संपन्न

**डांग : (समर्थ गांवकरी)**




डांग जिल्ह्यातील "प्रयोषा प्रतिष्ठान" संचलित मालेगाम शाळेत वर्षाच्या शेवटी अत्यंत प्रेरणादायी व भावनिक असा 'मातृ-पितृ वंदना कार्यक्रम' मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने पार पडला. या प्रसंगी इयत्ता १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी शुभेच्छा तसेच बक्षीस वितरण समारंभाचे आयोजनही करण्यात आले होते. हा त्रिवेणी संगम कार्यक्रम विद्यार्थी व पालकांसाठी प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमात स्वागत समारंभ, सांस्कृतिक सादरीकरणे व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. मातृ-पितृ वंदना अंतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांना मंचावर बसवून मंत्रोच्चारासह पूजा-आरती केली, अष्टांग नमस्कार व प्रदक्षिणा घातली आणि स्वतः तयार केलेल्या थाळीतून प्रेमाने जेवू घातले. हा भावनिक सोहळा शाळेच्या संस्कारप्रधान परंपरेचे उत्तम उदाहरण ठरला.

कार्यक्रमास उपस्थित डांग जिल्हा कलेक्टर शालिनी दुहान, विश्वस्तगण व मान्यवरांचे डांगी संस्कृतीनुसार वाजत-गाजत स्वागत करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनी केल्याने त्यांची कौशल्ये व आत्मविश्वास प्रकर्षाने दिसून आला. मान्यवरांचा शब्दपरिचय देऊन श्रीफळ अर्पण करून स्वागत करण्यात आले.

प्रसंगोचित उद्बोधनात पूज्य पी. पी. स्वामीजी म्हणाले, "आई-वडील हे या पृथ्वीवरील साक्षात देव आहेत. त्यांची सेवा हीच देवाची खरी आराधना आहे. आई-वडिलांशिवायचे जीवन शून्यासमान आहे." त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील प्रथम कर्तव्याबाबत मार्गदर्शन करून आशीर्वाद दिले.

कलेक्टर शालिनी दुहान यांनी या अनोख्या व संस्कारयुक्त कार्यक्रमाचे कौतुक करत संस्थेचे अभिनंदन केले आणि इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व आशीर्वाद दिले.

गुरुवंदना प्रसंगी विद्यार्थ्यांनी गुरुजन व मान्यवरांवर पुष्पांजली अर्पण केली; त्यानंतर विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच इयत्ता ९ वी ते १२ वी च्या वार्षिक परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान व प्रोत्साहनपर बक्षिसे मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. वर्षभरातील विविध उपक्रम—कला महाकुंभ, कला महोत्सव, खेल महाकुंभ तसेच तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय प्रतिनिधित्व करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही गौरविण्यात आले.

गेल्या दहा वर्षांपासून शाळेप्रती अपार आपुलकी जपणाऱ्या दानशूर शारदाबेन व देवजीभाई यांनी इयत्ता १२ वीच्या विद्यार्थिनींना पैंजण, ड्रेस व घड्याळे देऊन पालकत्वाची भावनिक भूमिका निभावली. तसेच हेमंतभाई आर. पटेल यांनी इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांना घड्याळे देऊन प्रोत्साहन दिले.

कार्यक्रमाच्या शेवटी मातृ-पितृ वंदना अंतर्गत पूजा-अर्चना झाल्याने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले. कार्यक्रमाची सांगता व आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका जागृतीबेन सावंत यांनी केले. त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# पोस्ट ऑफिस बंद करण्याच्या हालचालींना तीव्र विरोध

## लोकशाही मार्गाने आंदोलनाचा इशारा




**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर येथील सर्जेपुरा भागातील पोस्ट ऑफिस बंद करण्याबाबत सुरू असलेल्या हालचालींमुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र अस्वस्थता निर्माण झाली असून, या निर्णयाला स्थानिक लोकप्रतिनिधींसह नागरिकांनी जोरदार विरोध दर्शविला आहे.

यासंदर्भात उपमहापौर, नगरसेविका व नगरसेवकांनी मा. वरिष्ठ डाक अधीक्षक, हेड पोस्ट ऑफिस, अहिल्यानगर यांना निवेदन देत सर्जेपुरा पोस्ट ऑफिस कोणत्याही परिस्थितीत बंद करू नये, अशी ठाम मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे सर्जेपुरा पोस्ट ऑफिस हे सर्जेपुरा, तेलीखुंट, डाळमंडई भागातील रामवाडी, बागडपट्टी, दादा गॅरेज, कोठला बस स्थानक, दिल्ली गेट परिसर, बालिकाश्रम रोड आदी दाट लोकवस्तीच्या परिसरासाठी अत्यंत महत्त्वाचे केंद्र आहे. या भागातील खातेदारांची संख्या मोठी असून, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, तसेच सुमारे २० अल्पबचत एजंट व त्यांच्याशी संबंधित शेकडो खातेदारांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होणार आहे, असा मुद्दा लोकप्रतिनिधींनी उपस्थित केला आहे.

तसेच या परिसरात पंजाब बँक, एस.टी. विभागीय कार्यशाळा, पोलीस मुख्यालय, ओरिएंटल बँक, लातूर बँक, बँक ऑफ इंडिया, इंडसइंड बँक यांसारख्या महत्त्वाच्या शासकीय व खासगी संस्था कार्यरत आहेत.

या सर्व संस्थांसाठी सर्जेपुरा पोस्ट ऑफिस हे सोयीचे आणि जवळचे सेवा केंद्र असून, ते बंद झाल्यास व्यवहारांवर प्रतिकूल परिणाम होणार आहे. विशेषतः महिला अल्पबचत एजंट यांच्या रोजगारावर आणि कामकाजावर याचा गंभीर परिणाम होईल, अशी स्पष्ट भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे.

लोकप्रतिनिधींनी स्पष्ट इशारा देत सांगितले आहे की, जर सर्जेपुरा पोस्ट ऑफिस बंद करण्याचा निर्णय मागे घेण्यात आला नाही, तर परिसरातील निवडून दिलेले प्रतिनिधी आणि नागरिक लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडतील. हा निर्णय सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय दृष्टिकोनातून अयोग्य असून, नागरिकांच्या मूलभूत सोयींवर गदा आणणारा असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

या निवेदनावर उपमहापौर धनंजय कृष्णा जाधव, नगरसेविका सौ. शीतल अजय ढोणे, सौ. मयुरी प्रशांत जाधव आणि सागर राजू मुर्तडकर यांच्या स्वाक्षऱ्या असून, सर्जेपुरा पोस्ट ऑफिस बंद न करण्याची एकमुखी मागणी करण्यात आली आहे. डाक विभाग याबाबत कोणता निर्णय घेतो, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# बोळेगावचा निलंबीत ग्रामरोजगार साह्यक पुन्हा कामावर

■ ग्रामसेवकाकडून ग्रामरोजगार साह्यकाची पाठराखण





**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

बिलोली तालुक्यातील मौ. बोळेगाव येथे रोहयो योजनेच्या कामात गैरव्यवहार करून शासनाची निधी हडप केल्या प्रकरणी ग्रामस्थांच्या तक्रारीच्या अनुषंगाने येथील ग्रामरोजगार साह्यक विठ्ठल एकंबे यास दि.२५ ऑगस्ट २०२५ रोजीच्या घेण्यात आलेल्या ग्रामसभेत पदावरून निलंबीत करण्यासाठी एकामताने ठराव पारित करण्यात आला. परंतु संबंधित ग्रामसेवकाच्या वर्दहस्तामुळे तो रोजगार साह्यक पुन्हा कामावर रुजूला झाला आहे,म्हणून रोह्योच्या कामात पुन्हा अडचण निर्माण करणार असल्याने गावाकऱ्याकडून संताप व्यक्त केल्या जाते.

बिलोली रोहयो विभागातील साह्यक कार्यक्रम अधिकारी साहेबराव सोंडारे यांच्या आशीर्वादाने मौ बोळेगाव येथील ग्रामरोजगार साह्यकाचा मनमानी कारभार चालू आहे. रोहयो योजने अंतर्गत झालेल्या सार्वजनिक वृक्ष लागवड, घरकुलसह शेतकऱ्यांच्या वैयक्तिक योजनेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करून शासनाचे लाखो रुपये हडप केले आहे. याबाबत बोळेगावचे जागरूक नागरिक व संबंधित लाभार्थ्यांनी बोळेगाव ग्रामपंचायत कार्यालय व उपमुख्यकार्यकारी अधिकारी अमित राठोड नांदेड यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार दि.२५ ऑगस्ट २०२५ रोजी ग्रामपंचायत स्थरावर झालेल्या ग्रामसभेत ग्रामरोजगार साह्यक विठ्ठल एकंबे यास कामावरून निलंबीत कारण्याचा एकमताने ठराव पारित करून त्यास वरील तारखेपासून रोजगार साह्यक पदावरून निलंबीत करण्यात आले होते. परंतु संबंधित ग्रामसेवक व रोहयो विभागाचे एपीओ यांचे आर्थिक हीत संबंध असल्यामुळे त्यास पाठीशी घातल्या जात आहे. म्हणून तो रोजगार साह्यक पुन्हा कामावर रुजू झाला आहे. यामुळे पुन्हा रोहयोच्या कामात अडथळा निर्माण करणार असल्याने ग्रामस्थाकडून संताप व्यक्त केल्या जात आहे.

# निधी कमी पडू देणार नाही - बालाजी खतगावकर



**बिलोली : (समर्थ गांवकरी)**

बिलोली शहराच्या प्रलंबित विकासकामा संदर्भात मंत्रालयात पाठपुरावा करून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर यांनी बिलोली नगर परिषदेत सदिच्छा भेटी दरम्यान दिली आहे.

बिलोली तालुक्याचे भूमिपुत्र व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर हे कांही खाजगी कामानिमित्त बिलोली तालुक्यात आले असता त्यांनी नगर परिषदेस सदिच्छा भेट दिली. नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी शहराच्या विविध विकासकामा संदर्भात चर्चा केली असता खतगावकर यांनी विकासकामा संबंधित प्रशासकीय कामाचा पाठपुरावा करून शहराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही दिली. यावेळी नगर परिषदेचे नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी, उप नगराध्यक्ष अनुप अंकुशकर, गटनेता नागनाथ तुम्मोड, नगरसेवक यशवंत गादगे, नगरसेवक उमेश बिलोलीकर यांनी बालाजी पाटील यांचा यथोचित सत्कार केला. या प्रसंगी माजी उपाध्यक्ष मारोती पटाईत, माजी नगराध्यक्ष विजय कुंचनवार,गंगाधर शिंदे, नगरसेवक शिवाजी गायकवाड, महेंद्र गायकवाड, राजू कुडके, डॉ. मनोज शंखपाळे,अब्दुल फिरदोस, वासिम बेग इनामदार,सादिक पटेल,अर्जुन खंडेराय,मुकिंदर कुडके, बाबा नाईकवाडी, रितेश अडबे यांच्या अनेक जण उपस्थित होते.

# शुल्क आकारणीचा निर्णय करा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

आता शासकीय रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी शुल्क आकारणी करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने घेण्यात आला आहे. याबाबतची "सुधारित व अद्यावत नागरिकांची सनद" नुकतीच जारी करण्यात आली आहे. यापूर्वी ही सुविधा पूर्णतः मोफत होती. सरकारच्या या शासन निर्णयावर अहिल्यानगर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तीव्र हरकत घेण्यात आली आहे. सर्वसामान्य नागरिक, गोरगरीब जनतेवर अन्याय करणारा हा शासन निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केली आहे.

# सामूहिक मनाचे श्लोक पठण उपक्रमाचे आयोजन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

दासनवमी निमित्त श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाने आपल्या चारही विभागाच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सामूहिक मनाचे श्लोक पठण उपक्रमाचे आयोजन केले.नगरमधील सांगळे गल्लीतील श्री समर्थ विद्यामंदिर येथे दास नवमीचे औचित्य साधून अत्यंत भक्तिमय व संस्कारक्षम वातावरणात विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात शाळेतील सुमारे एक हजार विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन समर्थ रामदास स्वामी रचित मनाचे श्लोक सामूहिकरित्या म्हटले. विद्यार्थ्यांच्या एकमुखी श्लोक पठणाने संपूर्ण शालेय परिसर अध्यात्मिक ऊर्जेने भारावून गेला. या कार्यक्रमास शाळेचे शालेय समितीचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी,मुख्याध्यापक अजय महाजन, माध्यमिक विभागाचे



मुख्याध्यापक सुनील कानडे तसेच शिक्षकवर्ग व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमाला विशेष शोभा प्राप्त झाली. श्रीपाद कुलकर्णी यांनी समर्थ रामदास स्वामींच्या विचारांचे महत्त्व विषद करून मनाचे श्लोक हे विद्यार्थ्यांच्या जीवनात शिस्त, संयम, आत्मविश्वास व चारित्र्यनिर्मितीसाठी मार्गदर्शक ठरतात, आजच्या धकाधकीच्या जीवनात अशा संस्कारक्षम उपक्रमांची नितांत गरज असून शाळा अशा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची रुजवणूक करत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग व शिस्तबद्ध सादरीकरण हे या उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. सदर उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्मिक जाणीव निर्माण होऊन संस्कारांचे महत्त्व अधोरेखित झाले. शाळेचे मुख्याध्यापक अजय महाजन यांनी दासनवमी निमित्त विविध स्पर्धांचे आयोजन केल्याचे सांगितले. पाठांतर, निबंध, हस्ताक्षर, चित्रकला, वकृत्व, सूर्य नमस्कार या स्पर्धांचे आयोजन केले गेले. शहरातील बहुसंख्य शाळांनी यात सहभाग घेतला यशस्वी विद्यार्थ्यांना दासनवमी दिवशी बक्षीस वितरण होणार आहे तसेच परमपूज्य श्री अजेय बुवा रामदासी यांचे प्रवचन श्री समर्थ प्रशाला सावेडी येथे बुधवार दिनाक ११ फेब्रुवारी संध्या ५.०० वाजता आयोजित केले आहे.

# हिंदसेवा मंडळातर्फे प्रा.धोपावकर, प्रा.थोरात व प्रा.शेळके यांचा सत्कार

■ क्रीडा शिक्षकांच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे सारडा महाविद्यालयाचा प्रगतीचा आलेख उंचावला - संजय जोशी



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

प्रा.संजय धोपावकर यांनी २७ वर्षाच्या कार्यकाळात सहा शिवछत्रपती पुरस्कार खेळाडू तसेच अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविले आहेत. तसेच प्रा. साईनाथ थोरात यांना यंदाच्या वर्षी गुणवंत क्रीडा पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. यामुळे सारडा महाविद्यालयाच्या बहुमान वाढला आहे. तसेच प्रा.डॉ.रत्ना शेळके यांनी आरोग्याचा लढा देऊन दुर्धर आजारावर मात केली आहे.व पुन्हा महाविद्यालयामध्ये सेवेत रुजू झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. महाविद्यालयातील क्रीडा शिक्षकांच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे सारडा महाविद्यालयाचा प्रगतीचा आलेख उंचावला आहे.असे प्रतिपादन संजय जोशी यांनी केले आहे.

सारडा महाविद्यालयातील वरिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक क्रीडा संचालक प्रा.संजय धोपावकर यांचा सेवापूर्ती निमित्त,साईनाथ थोरात यांना सायकलिंग मध्ये गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार तसेच वरीष्ठ महाविद्यालयाच्या प्रा.डॉ.रत्ना शेळके यांनी दूर्धर आजारावर मात करून सेवेत रुजू झाल्याबद्दल हिंद सेवा मंडळातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी हिंदसेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी, उपाध्यक्ष मधुसुदन मुळे,माजी कार्याध्यक्ष अँड.अनंत फडणीस,अजित बोरा,जुनिअर कॉलेजचे चेअरमन डॉ.पारस कोठारी, अनंत देसाई,प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित, उपप्राचार्य गिरीश पाखरे, प्रबंधक अशोक असेरी,पर्यवेक्षक डॉ.राजु रिक्कल,एम आर कुलकर्णी, सुपरवायझर डॉ.सुजित कुमावत,डॉ. स्मिता भुसे परीक्षा विभाग प्रमुख,प्रा. संजय साठे, प्रा.निनाद बडेकर,प्रा. अतुल कुलकर्णी आदींसह सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना प्रा.संजय धोपावकर म्हणाले, हिंदसेवा मंडळाच्या वतीने चांगल्या कार्याचे नेहमीच कौतुक केले जाते. तसेच सर्व संचालक मंडळ व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळेच क्रीडा क्षेत्रात भरीव कार्य करण्याची संधी मिळाली.महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्या माध्यमातून उत्कृष्ट खेळाडूंना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.संजय साठे यांनी केले.सूत्रसंचालन प्रा.निनाद बेडेकर यांनी केले.तर आभार प्रा. अतुल कुलकर्णी यांनी मानले.

# भजन संध्येचा अनोखा कार्यक्रम

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

सहकार सभागृह रोड येथील केशर गुलाब येथे महाशिवरात्रीनिमित्त "द मिस्टीक आय" या संस्थेमार्फत रविवारी दि.१५ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी साडेसहा वाजता "शिवोहम" ध्यान शिबिराचे व भजन संधेचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये आध्यात्मिक ज्ञानाचे जीवनातील महत्त्व,ध्यान धारणा,मानसिक स्वास्था द्वारे आरोग्याची काळजी घेणे.या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

महाशिवरात्रीच्या पावन पर्वा निमित्त महादेवाच्या सानिध्यात आत्म शुद्धीचा पवित्र स्पर्श करणारा भजन,ध्यान व मंत्र जपाचा दिव्य अनुभव घेण्यासाठी व महाशिवरात्रीच्या पावन पर्वाचा आत्म साक्षात्कार घडावा यासाठी या कार्यक्रमात सहभागी व्हावे.

# मुस्लिम वधुवर (रिश्ता) मेळाव्याचे नगरमध्ये १२ फेब्रुवारी रोजी भव्य आयोजन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर शहरात विवाह इच्छुकांसाठी एक उत्तम संधी उपलब्ध होत असून गुरुवार दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १२ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत एकदिवसीय भव्य मुस्लिम वधुवर रिश्ता मेळावा आयोजित करण्यात आला असल्याचे रहमत सुलतान मॅरेज ब्युरोचे आरिफ सय्यद यांनी सांगितले. सदर मेळावा सर्व मुस्लिम बिरादरीतील नागरिकांसाठी खुला व मोफत असून विवाहासाठी योग्य स्थळ शोधणाऱ्या कुटुंबांना एकाच ठिकाणी अनेक पर्याय उपलब्ध होणार आहेत. या मेळाव्यात संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या विवाहयोग्य मुला-मुलींचे फोटो व बायोडाटा पाहण्याची सुविधा उपलब्ध असेल. डॉक्टर, इंजिनियर, सुशिक्षित तसेच कमी शिक्षित, अविवाहित,





घटस्फोटित, विधवा-विधुर अशा सर्व प्रकारच्या रिश्त्यांची माहिती येथे मोफत पाहायला मिळणार आहे असे युनूस तांबटकर यांनी सांगितले. या वधू-वर परिचय मेळाव्यासाठी येणाऱ्या पालकांनी आपल्याकडील मुला-मुलींचे फोटो व बायोडाटा सोबत आणणे आवश्यक आहे. इच्छुकांना आपल्या पसंतीनुसार योग्य रिश्ता शोधण्याची संधी मिळणार असून त्यामुळे विवाह जुळविण्याची प्रक्रिया सुलभ होणार असल्याचे शफकत सय्यद यांनी सांगितले. या मेळाव्यासाठी प्रवेश पूर्णतः मोफत आहे. मात्र ज्या व्यक्तीकडे फोटो बायोडाटा असेल त्यांनाच प्रवेश दिला जाणार आहे. मेळाव्यानंतर घरी बसून पुढील संपर्कासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. विवाह इच्छुक कुटुंबांनी या संधीचा लाभ घ्यावा, अधिक माहितीसाठी 75178 60786 व 98506 87868 यानंबरवर संपर्क करावे असे आवाहन आबीद दुलेखान यांनी केले आहे.

# तरुणीचा विनयभंग करून लग्नासाठी मारहाण

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील एका खासगी रुग्णालयात परिचारिका म्हणून काम करणाऱ्या तरुणीचा विनयभंग करून तिला मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. लग्नास नकार देऊन भ्रमणध्वनी क्रमांक काळया यादीत टाकल्याच्या रागातून एका तरुणाने हे



कृत्य केले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आणि जामगाव येथील प्रशांत जगन्नाथ बरवे यांची पाच वर्षांपासून ओळख होती. मात्र, काही काळापासून तरुणाने शिवीगाळ करण्यास सुरुवात केल्याने तरुणीने त्याच्याशी बोलणे बंद केले होते. याचाच राग मनात धरून रविवारी दुपारी तरुणी कामावरून घरी जात असताना आरोपीने तिचा रस्ता अडवला. "तू माझ्याशी का बोलत नाहीस, माझा क्रमांक का बंद केलास?" अशी विचारणा करत त्याने तरुणीचा हात पकडून विनयभंग केला. यावेळी तरुणीने विरोध केला असता आरोपीने तिला हाताने मारहाण केली. पीडिता तेथून घरी निघाली असता आरोपीने तिचा पाठलाग केला. "जर तू माझ्याशी लग्न केले नाहीस, तर मी आत्महत्या करीन," अशी धमकीही त्याने दिली. या प्रकारामुळे घाबरलेल्या तरुणीने तातडीने घरच्यांना माहिती देऊन पोलिसांत धाव घेतली. तोफखाना पोलिसांनी याप्रकरणी प्रशांत बरवे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास महिला पोलीस अंमलदार करत आहेत.

# सौ. वर्षाताई संजय भोसीकर यांचा अनोखा वाढदिवस साजरा

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.वर्षाताई भोसीकर यांनी आपल्या अभिष्टचिंतनाच्या औचित्याने समाजसेवेचा आदर्श ठेवत एक अनोखा वाढदिवस साजरा केला.फुलवळ व फुलवळ ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या सोमासवाडी,महादेव तांडा,केवळा तांडा अंगणवाडीत शिक्षण घेणाऱ्या २२२ चिमुकल्यांना गणवेश व पोषण आहाराचे वाटप करून त्यांनी सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण समाजापुढे ठेवले.

सौ.वर्षाताई भोसीकर या पंचक्रोशीत "अनाथांची माय" म्हणून परिचित आहेत.दरवर्षी वाढदिवस वेगळ्या संकल्पनेतून व समाजोपयोगी उपक्रमातून साजरा करण्याची त्यांची परंपरा आहे. यापूर्वी त्यांनी अनाथ मुलांना दत्तक घेऊन त्यांच्या



शिक्षणाचा संपूर्ण खर्च उचलत पालकत्वाची जबाबदारी समर्थपणे निभावली आहे.

बसवेश्वर विद्यालय फुलवळ तालुका कंधार येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ.विमलबाई मंगनाळे या होत्या या कार्यक्रमाला कंधार तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर,सेवानिवृत्त तालुका कृषी अधिकारी विश्वंभरराव मंगनाळे,माजी पंचायत समिती सदस्य रामभाऊ देवकांबळे,नगरसेवक दिलीप बसवंते,माजी सरपंच

■ अंगणवाडीतील 222 चिमुकल्यांना गणवेश व पोषण आहाराचे वाटप

रामाजी कांगणे,बसवेश्वर मंगनाळे,रामराव पाटील मंगनाळे,मुख्याध्यापक बापुराव मंगनाळे,परमेश्वर मंगनाळे, शिवराम पांडागळे,तालुका सचिव सुरेश कल्लाळीकर,उपसरपंच नागनाथ हेंडगे,जयराम पाटील मोरे,परमेश्वर घूगे,प्रभाकर व्यवहारे,मोहन पाटील वडजे, मनोहर पाटील चांडोळकर,नवनाथ बनसोडे,गंगाधर कांगणे,मुन्ना बसवंते,उध्दव गुट्टे माऊली बेंद्रे,केदार देवकांबळे,माधव बसवंते,रमेश होनराव,राजु गंदलवाड,पत्रकार धोंडिबा बोरगावे,विश्वंभर बसवंते,परमेश्वर डांगे,शुभम केंद्रे, आदींसह अंगणवाडी,पर्यवेक्षिका,कार्यकर्त्या,मदतनीस,पालक गावातील,परिसरातील नागरिक व बालक उपस्थित होते

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगत ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज व राष्ट्रमाता मॉ.जिजाऊ साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन,पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व अंगणवाडीतील 222 बालकांना गणवेश वाटप करण्यात आले विशेष म्हणजे, 2013 साली जिल्हा परिषद सदस्या असताना फुलवळ येथील 33 कुपोषित बालकांना दत्तक घेऊन त्यांना कुपोषणमुक्त करण्याचे कार्य त्यांनी यशस्वीपणे केले.त्याच काळात नांदेड जिल्ह्यात कुपोषणमुक्तीच्या चळवळीची सुरुवात करून त्यांनी समाजजागृतीचा भक्कम पाया घातला होता.

याप्रसंगी संजय भोसीकर यांना आपले मनोगत व्यक्त केले व फुलवळ सर्कलमध्ये यापुढे अशी सामाजिक उपक्रम राबवण्याचा मनोगत व्यक्त केले,यावेळी बोलतांना सौ.वर्षाताई भोसीकर म्हणाल्या की माझा वाढदिवस मी दरवर्षी सामाजिक उपक्रमाणे साजरा करत असते सन 2013 पासुन मी घेतलेला कुपोषित मुक्तीचा वसा आजही चालू असुन भविष्यामध्ये कायम चालू राहील या कार्यक्रमामध्ये दर्पण दिनानिमित्त फुलवळ पत्रकार संघातील सर्व पत्रकारांचा सन्मान संजय भोसीकर यांच्या हस्ते करण्यात आला ,कार्यक्रमानंतर अंगणवाडी,पर्यवेक्षिका,मदतनीस कार्यकर्त्यां व फुलवळ सर्कल मधील कार्यकर्त्यांच्या वतीने वतीने सौ.वर्षाताई यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# १३ फेब्रुवारी रोजी 'उत्तर' घरोघरी पोहोचणार

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

कायमच पुढे जाण्याच्या लगबगीत असलेल्या दुनियेला सातत्याने डावलल्या जाणाऱ्या प्रश्नावर विचार करायला लावणारे 'उत्तर'. आपण कायमच 'उद्या बघू' म्हणून जे टाळतो त्याचे नेमके काय होते? अव्यक्त प्रेमावरील भाष्य. पुढे ढकलण्यात आलेले सत्य. क्षमाशीलतेसाठी वेळ असतो असे गृहीत धरले जाते. आपल्या शांत भावनिक प्रामाणिकपणाने चित्रपटगृहातील प्रेक्षकांच्या मनाला भिडलेला, उत्तर आता 13 फेब्रुवारी रोजी मराठी ZEE5 वरील वर्ल्ड डिजिटल प्रीमिअरद्वारे देशभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज आहे.

मनातून अगदी खोलवर हेलावणारे आणि जिव्हाळ्याचे मानवी नाट्य, 'उत्तर' प्रेम, संबंध, क्षमा आणि स्वत्व या नेहमीच 'उद्यावर' ढकलल्या जाणाऱ्या




स्थगित भावनिक मूल्यांचा शोध घेते. ही कलाकृती दैनंदिन वास्तवात रुजलेली असली तरी तिच्या प्रतिध्वनीत सार्वत्रिक असलेला हा सिनेमा त्या नाजूक क्षणांचे चित्रण करतो. वेळ आपल्या हातातून निसटून जाताना जीवन अशी उत्तरं मागते जी देण्यास आपण तयार नसतो. संवेदनशीलता, संयम आणि अस्सल भावनिक स्पष्टतेसह उत्तर सापडते. फायनल फ्रेमनंतरही बराच काळ मनात रेंगाळते. जे क्षण आपण पुढे ढकलतो आणि नात्यातील जे बंध वाट पाहतील असं आपण गृहीत धरतो; त्यावर चिंतन करण्यास आमंत्रित करते.

या कलाकृतीच्या केंद्रस्थानी प्रेम, महत्त्वाकांक्षा आणि वाढत्या मौनामुळे आकार घेतलेले एक कोमल, गुंतागुंतीचे आई-मुलाचे नाते आहे. उमा ही एक आई. जिची उबदार माया शांतपणे तिच्या कुटुंबाला एकत्र ठेवते. निनाद हा एक तरुण. घरापासून जवळजवळ नकळत दूर जात असताना जीवनात पुढे जात असताना, स्वतःचा संघर्ष बाजूला ठेवून परिस्थितीला दोष न देता भावनिक अंतर पार करण्याच्या कसरतीत दिसतो. समकालीन जीवनाच्या आणि पिढ्यांदरम्यान होणाऱ्या बदलाच्या लयबद्धतेवर आधारित, 'उत्तर' हे दर्शविते की नातेसंबंध अनेकदा संघर्षातून नव्हे, तर योग्य क्षणाची, योग्य शब्दांची, योग्य वेळेच्या प्रतिक्षेत कसे तुटतात!

क्षितिज पटवर्धन लिखित आणि दिग्दर्शित, आणि Zee स्टुडिओज आणि जॅकपॉट एंटरटेनमेंट निर्मित, 'उत्तर' मध्ये रेणुका शहाणे आणि अभिनय बेर्डे यांच्या भूमिका अत्यंत प्रभावी आहेत. तसेच हृता दुर्गुळे आणि निर्मिती सावंत यांची अदाकारी अधिकच भावनिक सखोलता जोडणारी आहे. परिस्थिती आई आणि मुलाच्या नात्याला एका वळणावर आणत असताना, प्रेम, क्षमा आणि शेवटी एकमेकांसाठी; स्वतःसाठी दाखवावे लागणारे धैर्य आत्म्याला हेलावणाऱ्या शोधात कथा उलगडतात. या चित्रपटाबद्दलचे आपले विचार मांडताना रेणुका शहाणे म्हणाल्या, "उमाची व्यक्तिरेखा ही धैर्य, प्रेम आणि गोष्टी अखेरीस मार्गाला लागतील या अव्यक्त आशेवर आकार घेतलेले पात्र आहे. उमा साकारणे अतिशय भावूक करणारे होते. कारण तिच्या शांततेला शब्दांइतकाच आवाज होता. उत्तर आता अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल म्हणून मी आभारी आहे. जिथे मनातील भावना अगदी जवळून अनुभवल्या जाऊ शकतील".

अभिनय बेर्डे पुढे म्हणाला, "निनाद' हा सतत पुढे जाणाऱ्या एका पिढीचे प्रतिनिधित्व करतो. अनेकदा आपण मागे काय सोडले याचे परीक्षण करण्याइतपत वेळ निनादकडे नसतो. मी निनाद वठवताना मला महत्त्वाकांक्षा, भावनिक अंतर आणि घराचे मनातून वाटणारे आकर्षण प्रतिबिंबित करण्यास मदत झाली. 'उत्तर' आता ZEE5 वर प्रेक्षकांच्या भेटीला येईल याचा मला आनंद आहे".

## ब्रेस्ट कॅन्सरच्या जागरूकतेसाठी 'सुता' देखील 'पिंक टॅग' उपक्रमात सहभागी

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

'फेडरल बँक होर्मिस मेमोरियल फाऊंडेशन' आणि 'नेटवर्क-एटीन संजीवनी' यांच्या 'पिंक टॅग प्रोजेक्ट' मध्ये आता देशांतर्गत डी-टू-सी फॅशन ब्रँड 'सुता' सहभागी झाला असून, ब्लाउजवरील वॉश-केअर लेबलजवळ शिवलेल्या साध्या गुलाबी टॅगद्वारे महिलांना स्वतःची स्तन तपासणी कशी करावी याबाबत सौम्य व भीतीमुक्त मार्गदर्शन दिले जात आहे; ग्रामीण शिंपी, स्वयंसेविका आणि समुदायाच्या सहभागातून सुरू झालेली ही कल्पना आता फॅशनच्या मुख्य प्रवाहात येत लाखो महिलांपर्यंत आरोग्यजागरूकतेचा संदेश पोहोचवत आहे, विशेषतः भारतात दर चार मिनिटांनी एका महिलेला स्तनाच्या कर्करोगाचे निदान होत असताना आणि ७० टक्क्यांहून अधिक प्रकरणांमध्ये उशिरा निदान होत असताना;



'सुता' च्या सह-संस्थापिका सुजाता बिस्वास व तानिया बिस्वास यांनी कपड्यांद्वारे ओळख, आत्मविश्वास आणि स्वतःची काळजी यांचा संगम घडवण्याचा उद्देश व्यक्त केला असून, न्यूज-एटीन स्टुडिओजचे सीओओ सिद्धार्थ सैनी आणि फेडरल बँकेचे चीफ मार्केटिंग ऑफिसर एम.व्ही.एस. मूर्ती यांनी या उपक्रमामुळे माध्यमे, उद्योग आणि समाज एकत्र येऊन सार्वजनिक आरोग्याबाबत दीर्घकालीन सकारात्मक बदल घडवू शकतात, असा विश्वास व्यक्त केला आहे.

## यूएईमार्गे जागतिक व्यवसाय संधींचा विस्तार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

जागतिक बाजारपेठेत प्रवेश आणि व्यवसाय विस्तारासाठी पुण्यात दोन दिवसीय B2B बैठकांचे आयोजन करण्यात येत आहे. FICCIच्या पुढाकारातून शारजाह एअरपोर्ट इंटरनॅशनल फ्री झोन (SAIF झोन), यूएई सरकार आणि Maharashtra Chamber of Commerce, Industry and Agriculture (MACCIA) यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. "यूएईद्वारे आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये तुमचा व्यवसाय वाढवा" या थीमवर आधारित या बैठका १० आणि ११ फेब्रुवारी २०२६ रोजी पुण्यातील JW Marriott Hotel Pune येथे होणार आहेत. पुणे आणि महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील उद्योग-व्यवसायांना यूएईमध्ये, विशेषतः SAIF झोनच्या माध्यमातून, ऑपरेशन्स सुरू करण्याच्या संधींबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. SAIF झोन हे या प्रदेशातील प्रगत, किफायतशीर आणि गुंतवणूकदार-अनुकूल मुक्त क्षेत्रांपैकी एक मानले जाते. या बैठकीत भारतीय कंपन्यांना मध्य पूर्व, आफ्रिका, युरोप आणि इतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी यूएई कसे प्रभावी जागतिक प्रवेशद्वार ठरू शकते, यावर विशेष मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच कंपनी स्थापन प्रक्रिया, परवाना, गोदाम सुविधा, लॉजिस्टिक्स उपाययोजना आणि बाजारपेठ प्रवेश धोरणांबाबत SAIF झोनचे वरिष्ठ अधिकारी थेट संवाद साधणार आहेत. याशिवाय भारत-यूएई व्यापक आर्थिक भागीदारी करार (CEPA) चा उपयोग करून व्यापार सुलभीकरण, शुल्क सवलती आणि सुलभ नियामक प्रक्रिया कशा मिळवता येतील, याबाबतही सहभागी उद्योगांना सविस्तर माहिती दिली जाणार आहे. या B2B बैठकीसाठी नोंदणी व वेळेच्या स्लॉटची पुष्टी करण्यासाठी इच्छुकांनी श्री. आशुतोष यांच्याशी ९६५०९०३२९९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे.

## पुण्यात ग्लोबल कपॅबिलिटी सेंटरची स्थापना

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

जागतिक स्तरावर पिगमेंट व रंगद्रव्ये उत्पादनातील अग्रगण्य असलेल्या सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड आणि प्रगत तंत्रज्ञान क्षेत्रातील जेनपॅक्ट या संस्थांच्या वतीने पुण्यात ग्लोबल कपॅबिलिटी सेंटरची स्थापना करण्यात आली आहे. सुदर्शन केमिकलचा जागतिक कार्यपद्धतीला अधिक सक्षम करण्यासाठी हे पाऊल महत्वपूर्ण ठरणार आहे. पुण्यातील बाणेर येथील सुदर्शन केमिकलच्या जागतिक मुख्यालयात स्थापन केलेल्या या केंद्राचे उद्घाटन नुकतेच झाले. या केंद्रात यापूर्वी विविध देशांत विभागून कार्यरत असलेली महत्त्वाची एंटरप्राइज कार्ये एकत्रित करण्यात आली आहेत.

## चित्रकला स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वामध्ये होणार रंगीबेरंगी उधळण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पहिल्या पर्वाला लहान मुलांकडून भरभरून मिळालेल्या प्रतिसादानंतर, ड्रोवी पुन्हा सज्ज आहे चिमुकल्यांच्या पसंतीस पडलेल्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेचे दुसरे पर्व म्हणजेच सीझन २ घेऊन येण्यासाठी. यानिमित्ताने त्यांना आपल्या मुक्त छंद विचारातून आणि कलेच्या माध्यमातून आपली कलाकृती साकारण्याची आणि व्यक्त होण्याची संधी मिळणार आहे. मागील वर्षाप्रमाणे यावर्षीच्या स्पर्धेची थीम आहे "Bored? Good! Ideas Flood!". याच थीमच्या सहाय्याने 'ड्रोवी बॉय' म्हणजेच, ड्रोवी या ब्रँडच्या खेळकर अशा मॅस्कॉटसोबत चिमुकल्यांना विविध रंगांच्या माध्यमांतून मनावरची मरगळ झटकून टाकण्यासाठी आणि कंटाळवाणी दिनचर्या मजेदार बनवण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेचे महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये जसे की मुंबई, पुणे, संभाजी नगर, कोल्हापूर,



सोलापूर, अकोला, अमरावती, नागपूर, नाशिक आणि सातारा इथे आयोजन केले जाणार आहे. यासोबतच मध्य प्रदेशातील इंदूर, रतलाम, खंडवा तसेच निजामाबादसारख्या इतर शहरांमध्येही याचे आयोजन करण्यात येणार आहे. या शहरांतील नामांकित बालरोगतज्ञांच्या सहयोगाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून त्यांचा सक्रिय पाठिंबा या स्पर्धेला असणार आहे.

१ ते ७ वर्षांच्या मुलांसाठीचे विषय: या वयोगटातील मुलांना सोप्या आणि आनंददायी प्रसंगांवर चित्र काढायला सांगितले जाईल, जसे की

- ड्रोवी आणि मी – आमच्या आवडत्या पाळीव प्राण्यासोबत
- ड्रोवी आणि मी – आमचे आवडते फळ खाताना
- माझ्या शाळेतील एक शिक्षक- ड्रोवी

७ ते १३ वर्षांच्या मुलांसाठीचे विषय: या वयोगटातील मुलांना कल्पक आणि सर्जनशील जगाची कल्पना करायला प्रोत्साहन दिले जाईल, जसे की

- ड्रोवी आणि मी – अवकाशात
- ड्रोवी आणि मी – आजीला मदत करताना
- ड्रोवी आणि मी – दोन सुपरहिरो

रस्त्यावरील प्राण्यांना मदत करताना

विजेते तीन विभागांमधून निवडले जातील. प्रत्येक विभागात प्रत्येक वयोगटातून पहिल्या तीन क्रमांकांना बक्षिसे दिली जातील.

बक्षिसांचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे:

विजेता: २१०० रुपये + सुवर्णपदक + प्रमाणपत्र

प्रथम उपविजेता: १५०० रुपये + रौप्यपदक + प्रमाणपत्र

द्वितीय उपविजेता: १००० रुपये + कांस्यपदक + प्रमाणपत्र

प्रत्येक स्पर्धकाला त्यांच्या प्रयत्नांबद्दल आणि सर्जनशीलतेबद्दल स्पर्धेतील सहभागाचे ई-प्रमाणपत्र दिले जाईल. स्पर्धेची अंतिम तारीख 20 फेब्रुवारी 2026 असून, निकाल 28 फेब्रुवारी 2026 रोजी जाहीर करण्यात येतील.

## बिझनेस समिट २०२६ : KEZAD ग्रुपने मांडल्या नव्या औद्योगिक संधी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

**प्रमुख बंदरे, विमानतळे आणि व्यापारी मार्गांशी जोडलेल्या योग्य ठिकाणी असलेल्या औद्योगिक क्षेत्रांमुळे, विविध उद्योगांना मदत करणाऱ्या क्षेत्र-केंद्रित सुविधा आणि उद्योगांसाठी अनुकूल वातावरण यांच्या माध्यमातून केझाड ग्रुप अबू धाबीच्या आर्थिक क्षेत्रांमधून जागतिक स्तरावर विस्तार करू इच्छिणाऱ्या भारतीय उद्योगांना दीर्घकालीन वाढीच्या संधी उपलब्ध करून देत आहे.**

यूएईमधील एकात्मिक व विशेष आर्थिक क्षेत्रांचा सर्वात मोठा ऑपरेटर आणि एडी पोर्ट्स ग्रुपचा भाग असलेल्या अबू धाबी येथील खलिफा इकॉनॉमिक झोन्स – केझाड ग्रुपने पुणे इंटरनॅशनल बिझनेस समिट (पीआयबीएस) 2026 मध्ये प्लॅटिनम प्रायोजक म्हणून ठळक उपस्थिती नोंदवली. या निमित्ताने भारत आणि यूएईमधील व्यावसायिक संबंध तसेच आर्थिक सहकार्य अधिक मजबूत करण्याची आपली बांधिलकी केझाड ग्रुपने पुन्हा एकदा व्यक्त केली.

पीआयबीएस 2026 मधील सहभागातून केझाड ग्रुपने हे स्पष्ट केले की, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा, विविध वाहतूक सुविधा, गुंतवणूकदारांसाठी अनुकूल नियम आणि जागतिक बाजारपेठांच्या जवळीक असलेली त्यांची एकात्मिक औद्योगिक व लॉजिस्टिक क्षेत्रे भारतीय उद्योगांना वेगाने आणि कार्यक्षम पद्धतीने आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्तार करण्यास मदत करतात.

पीआयबीएस च्या 7व्या आवृत्तीत 20 हून अधिक देशांतील प्रतिनिधी, 60 पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी व धोरणकर्ते तसेच जागतिक व्यापाराचे भविष्य घडवणारे आघाडीचे उद्योगतज्ज्ञ आणि विचार नेतृत्वातील प्रमुख व्यक्ती सहभागी झाले आहेत. ही परिषद देशांमधील सहकार्य, गुंतवणुकीवरील चर्चा आणि महत्त्वाच्या धोरणात्मक भागीदारीसाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरते. या वर्षीच्या समिटमध्ये अन्न-पेय (फूड अँड बेव्हरेजेस) आणि ऑटोमोबाईल उद्योगांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हे लक्ष केझाड ग्रुपच्या उद्दिष्टांशी पूर्णपणे सुसंगत आहे. केझाड ग्रुप आपल्या आधुनिक औद्योगिक इकोसिस्टमच्या माध्यमातून या प्राधान्य क्षेत्रांमध्ये वाढ घडवून आणण्यासाठी काम करत आहे.

केझाड ग्रुपच्या औद्योगिक परिसंस्था प्रगत उत्पादन आणि वितरण पायाभूत सुविधांच्या माध्यमातून नवकल्पनांना चालना देण्यासाठी आणि उद्योगांचा विस्तार वेगाने करण्यासाठी उभारण्यात आल्या आहे. केझाडचे अन्न व पेय (फूड अँड बेव्हरेजेस) औद्योगिक क्षेत्र हे मध्य पूर्व, युरोप, आफ्रिका आणि आग्नेय आशिया येथील वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांसाठी अन्न प्रक्रिया, साठवणूक आणि वितरणाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होत आहे. तसेच ऑटोमोबाईल औद्योगिक क्षेत्र वाहन उत्पादक, सुटे भाग पुरवठादार, वितरक आणि लॉजिस्टिक सेवा देणारे पुरवठादार यांच्यात समन्वय वाढवणारे अनुकूल वातावरण उपलब्ध करून देते, ज्यामुळे त्यांना जागतिक आणि प्रादेशिक बाजारपेठांमध्ये सहज प्रवेश मिळतो.

## सेंट फेलिक्स स्कूलचे यश

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

चौथ्या ओपन नॅशनल तायक्वांदो चॅम्पियनशिपमध्ये आर. बी. होरांगी व सेंट फेलिक्स हायस्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या स्पर्धेत फायट क्योरुगी, पूमसे, स्पीड किक, स्पीड पंच, जंप किक ब्रेकिंग, सेल्फ डिफेन्स व हापकिडो अशा विविध प्रकारांमध्ये खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले. एकूण ३५ सुवर्ण, ४० रौप्य व १५ कांस्य पदकांची कमाई केली. राष्ट्रीय पातळीवरील या स्पर्धेत महाराष्ट्रासह कर्नाटक, हरियाणा, गुजरात, आंध्रप्रदेश आदी राज्यांतून १३०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. तायक्वांदो क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या ग्रँड मास्टर्स व मास्टर्स यांच्या उपस्थितीने स्पर्धेला प्रोत्साहन मिळाले. श्री. दक्ष रमेश आढाव यांनी स्पर्धेसाठी मोलाचे सहकार्य केले.

## नवनिर्वाचित महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट



**पुणे: (समर्थ गांवकरी)**

विधान भवन, मुंबई येथे आज पुणे महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर आणि गटनेते गणेश बिडकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान पुणे शहराच्या विकासाशी संबंधित विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुलजी नार्वेकर, महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकारकडून पूर्ण सहकार्य देण्याची ग्वाही दिली. पायाभूत सुविधा, नागरी सुविधा, वाहतूक व्यवस्था तसेच प्रस्तावित विकास प्रकल्पांना गती देण्यासाठी आवश्यक ती मदत करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. या प्रसंगी रिपब्लिकन पक्षाचे पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, राज्य सचिव बाळासाहेब जानराव, भाजपचे दीपक नागपुरे उपस्थित होते. या भेटीमुळे पुणे शहराच्या विकासाला नवे बळ मिळेल, असा विश्वास नवनिर्वाचित महापौर व पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## कलाकार साजऱ्या करत आहेत प्रेमरंगाच्या सर्व छटा!

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

'व्हॅलेंटाइन डे' म्हणजे केवळ रोमँटिक प्रेमाचा उत्सव नाही; तर आपल्या आयुष्यात प्रेम किती वेगवेगळ्या रूपांत असते याची आठवण करून देणारा दिवस आहे. शांत साथ, खोल भावनिक नाती, आपल्या घरी असल्यासारखे वाटावे अशा मैत्री आणि काळासोबत अधिक घट्ट होत जाणारे संबंध यातील प्रेम हे अगदी आपण रोज पाहत आणि अनुभवत असलेल्या कथांप्रमाणेच सतत बदलत आणि विकसित होत असते. टेलिव्हिजनने वर्षानुवर्षे या भावना अतिशय सुंदररीत्या मांडल्या आहेत आणि वास्तविकतेशी जोडलेल्या, मनाला भिडणाऱ्या आणि आपल्याशा वाटणाऱ्या प्रेमकथा लाखो घरांपर्यंत पोहोचवल्या आहेत. वास्तविकतेतील भावना आणि नातेसंबंध प्रभावीपणे मांडणाऱ्या



कथा सादर करण्यासाठी ओळखली जाणारी झी टीव्ही ही वाहिनी प्रामाणिकपणे प्रेम साजरे करणाऱ्या आपल्या मालिकांमधून प्रेक्षकांच्या मनाला सातत्याने भिडत आहे. परिपक्व नाती, हळूवारपणे फुलणाऱ्या प्रेमकथांपासून ते उत्कट प्रेम आणि भावनिक प्रवासापर्यंत या कथा प्रेक्षकांना हेच सांगतात की प्रेम नेहमी परिपूर्ण असेलच असे नाही.

## सरहद स्वयंसेवी संस्थेला अहिंसा आणि शाकाहारासाठी पुरस्कार प्रदान

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

उत्कृष्ट मानवतावादी सेवेची दखल घेण्याच्या उद्देशाने भगवान महावीर फाउंडेशनतर्फे दिला जाणारा २९वा महावीर पुरस्कार सरहद या पुणेस्थित सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्थेला प्रदान करण्यात आला आहे. अहिंसा व शाकाहाराच्या समर्थनासाठी तसेच शिक्षण, सांस्कृतिक संवाद व जनसंवाद यांच्या माध्यमातून मानवतावादी मूल्यांना बढावा देण्यासाठी संस्थेने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची दखल महावीर पुरस्कार २०२६ द्वारे घेण्यात आली आहे. अहिंसा व शाकाहार, शिक्षण, वैद्यकशास्त्र आणि समुदाय व समाज सेवा या क्षेत्रांमधील कामगिरीसाठी दरवर्षी महावीर पुरस्कार प्रदान केला जातो. प्रत्येक महावीर पुरस्कार विजेत्याला १० लाख रुपये रोख आणि त्यासोबत स्तुतीपर मानपत्र व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

श्री. संजय नहार यांनी १९९५ मध्ये स्थापन केलेली सरहद पंजाब, जम्मू-काश्मीर व ईशान्य भारत आदी भारतातील संघर्षप्रवण भागांमध्ये शांतता राखण्यासाठी तसेच राष्ट्रीय एकात्मतेसाठी समर्पित सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्था आहे. शांततफेऱ्या, दोन धर्मांमधील संवाद, सांस्कृतिक उत्सव, शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थी आदानप्रदान उपक्रम यांच्याद्वारे 'सरहद' ने विविध समुदायांमध्ये सौहार्द, विश्वास व परस्पर सामंजस्य जोपासले आहे. त्याचबरोबर संघर्षप्रवण प्रदेशांतील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक व निवासी सहाय्यही संस्थेतर्फे पुरवले जाते.

सरहद संस्थेसोबतच पुढील संस्थांना २९व्या महावीर पुरस्काराने गौरवण्यात आले: कॉर्ड, हिमाचल प्रदेश, शिक्षण; श्री शंकरा कॅन्सर फाउंडेशन, कर्नाटक, वैद्यकशास्त्र; आणि श्रीमती संगखुमी बुआलचुआक, मिझोराम व निर्माण, ओडिशा, समुदाय व सामाजिक सेवा.

भगवान महावीर फाउंडेशनचे संस्थापक श्री. सुगलचंद जैन यावेळी म्हणाले, "सरहद संस्थेने अहिंसा व मानवतावादी मूल्यांचे चैतन्य कृतीत उतरवण्याचे उदाहरण घालून देण्याजोगे कार्य केले आहे. संवाद, शिक्षण व नीतीमत्तापूर्ण सहभाग समाज परिवर्तनात किती महत्त्वाची भूमिका बजावू शकतात हे 'सरदह' च्या कामातून दिसून येते. शांतता व सौहार्दाचा प्रसार करण्यासाठी 'सरहद' ने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा सन्मान करताना आम्हाला आनंद होत आहे. या पुरस्काराच्या रूपाने मिळालेली मान्यता 'सरहद' चे उद्दिष्ट आणखी दृढ करण्यात तसेच अन्य अनेकांना प्रेरणा देण्यात उपयुक्त ठरेल, अशी आशा आम्हाला वाटते."

२०२६ सालासाठी प्रदान केल्या गेलेल्या पुरस्कारांनंतर महावीर पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांची संख्या १०१ झाली आहे. हे १०१ पुरस्कारविजेते २६ राज्ये व २ केंद्रशासीत प्रदेशांतील आहेत. २९व्या पुरस्कारांपूर्वी महावीर पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांची संख्या ९६ होती. गेल्या अनेक वर्षांपासून महावीर पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान केले जात आहेत. यांमध्ये भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यांचे राज्यपाल, मुख्यमंत्री तसेच केंद्रीय मंत्री यांचा समावेश आहे. औपचारिक सोहळ्यांमध्ये हे पुरस्कार प्रदान केले जातात.

२९व्या महावीर पुरस्कारासाठी देशभरातून आलेल्या २६७ नामांकन अर्जांचे मान्यवरांच्या परीक्षण मंडळाद्वारे काळजीपूर्वक मूल्यमापन करण्यात आले. भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती श्री. एम. एन. वेंकटचलय्या यांच्या अध्यक्षतेखालील समितीने यंदा ही जबाबदारी पार पाडली. ज्येष्ठ संन्यासिनी आचार्य श्री. चंदनाजी महाराज, माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती डॉ. श्री. डी. वाय. चंद्रचूड, भारतीय रिझर्व बँकेचे अंशकालीन संचालक तसेच 'तुघलक' चे संपादक श्री. एस. गुरूमूर्ती, भारतीय विद्या भवन मंगलगुरू केंद्राचे चेअरमन प्राध्यापक बी. एम. हेगडे, भारताचे माजी मुख्य निवडणूक आयुक्त श्री. टी. एस. कृष्णमूर्ती, निवृत्त आयएएस अधिकारी तसेच सेबीचे माजी अध्यक्ष श्री. डी. आर. मेहता, भारत सरकारचे माजी कॅबिनेट सचिव श्री. प्रभात कुमार (निवृत्त आयएएस अधिकारी) आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री. जी. एस. सिंघवी यांचा परीक्षण मंडळावर समावेश होता.

# ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत सात केंद्रांवर परिक्षा सुरूळीत

## पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप जिल्हाधिकारी राहुल कर्डिले,यांनी बारावी परीक्षा केंद्रावर दिली भेट

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**






ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील सिडको परिसरातील तीन ठिकाणी तर वसरणी व वाजेगाव,कांकाडी येथील अशा ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील बारावीच्या सात परीक्षां केंद्रवर सुरुवात झाली असून याठिकाणी जवळपास पहिल्या दिवशी इंग्रजी विषयाचा पेपर 2574परिक्षार्थ्यांनी दिला, सिडकोतील शिवाजी विद्यालय येथे नांदेड़ परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी तर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी डॉ.खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड या वाघाळा येथील पोस्ट बेसिक महात्मा फुले आश्रम शाळेस भेट देऊन केंद्र परिसरातील परिक्षार्थी हॉल पहाणी केली. लातूर बोर्डाच्या उच्चमाध्यमिक च्या बारावी परीक्षांना दि.10 फेब्रुवारी पासून सुरुवात झाली सिडको परिसरातील शिवाजी उच्चमाध्यमिक सिडको या ठिकाणी 257 विध्यार्थ्यांनी परीक्षा दिली याठिकाणी केंद्र प्रमुख प्रा.एस.एम.देवरे असून पर्यवेक्षक काम पाहात आहेत, तर इंदिरागांधी ज्युनिअर कॉलेज येथे 374 विध्यार्थ्यांनी परीक्षा दिली, या ठिकाणी केंद्र प्रमुख म्हणून प्रा. सातानुरे सहाय्यक प्रा.डॉ.रमेश नांदेडकर हे काम पाहात आहेत, कुसुमताई उच्य माध्यमिक विध्यालय येथे 222 विध्यार्थ्यांनी परीक्षा दिली या ठिकाणी केंद्र प्रमुख म्हणून प्रा. भागवत हारे तर सहाय्यक म्हणून प्रा. अंगध केंद्रे ,हे कार्यरत आहेत वसरणी येथील वसंतरावनाईक कनिष्ठ महाविघालय येथे 247 विध्यार्थ्यांनी परीक्षा दिली, या ठिकाणी केंद्र प्रमुख म्हणून प्रा.एस. डब्लू.कोतवाल हे काम पाहात ,वाजेगाव येथील राष्ट्रमाता उच्य माध्यमिक विद्यालय येथील केंद्रावर परीक्षेला सुरुवात झाली या ठिकाणी 383 विध्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून या ठिकाणी केंद्र प्रमुख म्हणून प्रा.एस.एम.देशमुख हे काम पाहत असून शिवशक्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय काकांडी येथे 470 विद्यार्थी परीक्षा देत असून केंद्र प्रमुख प्रकाश पवार पर्यवेक्षक मुख्याध्यापक जाधव विपिन लक्ष्मणराव काम पाहत आहे तर वाघाळा पोस्ट बेसिक अश्राम शाळा महात्मा फुले महाविद्यालय वाघाळा या परीक्षा केंद्रावर केंद्रप्रमुख म्हणून भगवान इंगेवाड हे काम पाहत आहेत या ठिकाणी 621असे2574 परिक्षार्थी परिक्षा देत आहेत.

ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उपनिरीक्षकांसह पोलीस कर्मचारी व महिला पोलीस, होमगार्ड कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे परीक्षा केंद्रावर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे,परीक्षा केंद्रावर कॉपी मुक्त वातावरणात परीक्षांना सुरुवात झाली यावेळी परिक्षार्थी यांना गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. पहिल्या दिवशीच पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी ऊमाप यांनी सिडको येथील शिवाजी महाविद्यालयात या केंद्रावर भेट देऊन परिक्षार्थी हॉल पाहणी व संबंधित केंद्रावरील नियुक्त केंद्रप्रमुख,पर्यवेक्षक यांच्याशी सुसंवाद साधला व पोलीस बंदोबस्त आढावा घेतला, ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी संवेदनशील असलेल्या वाजेगाव,कांकाडी, वाघाळा या परिक्षा केंद्रावर जाऊन पाहणी करून पोलीस बंदोबस्त आढावा घेतला,तर जिल्हाधिकारी डॉ राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी डॉ.खल्लाळ , तहसीलदार संजय वारकड यांनी वाघाळा येथील महात्मा फुले अश्राम शाळेस भेट देऊन पाहणी केली.

# शेतकऱ्याची माजी सैनिक कल्याण निधी कुटुंबीयांना पाच हजारची मदत

## सामान्य शेतकऱ्याचं आदर्श घेऊन मदत करण्याचे आव्हान : चंद्रशेखर पाटील कोळीकर

**तामसा : (समर्थ गांवकरी)**




हदगाव तालुक्यातील कोळी येथील शेतकरी दादाराव संभाजी चौतमल या शेतकऱ्यांनी एका वर्तमानपत्रात नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी माजी सैनिक यांच्या कुटुंबीयांना आर्थिक निधी द्यावा अशी विनंती नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी एका वर्तमानपत्रात केली होती त्या वर्तमानपत्रातील बातमी वाचून हादगाव तालुक्यातील कोळी येथील सर्वसामान्य शेतकरी दादाराव संभाजी चोतमल या शेतकऱ्यांनी पाच हजार रुपयांचा धनादेश हदगाव चे तहसीलदार यांना सुपूर्द केला व फुल नाही फुलाची पाकळी समजून याचा स्वीकार करावा हदगाव तालुक्यातील एका सामान्य शेतकऱ्यांनी माजी सैनिक कल्याण निधीसाठी पाच हजाराचा निधी दिला त्यामुळे या शेतकऱ्याचे सर्व कौतुक होत आहे

यावेळी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सदस्य चंद्रशेखर पाटील हादगाव चे तहसीलदार नायब तहसीलदार तामसकर , विजय चौतमाल व विलास महाजन उपस्थित होते

# आदिवासी कुटुंबातील मुलगा झाला महसूल सहाय्यक

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**



नायगाव तालुक्यातील -प्रभाकर गाजलवाड राहणार कोकलेगाव येथील कष्टकरी, अल्पभूधारक शेतकरी , बालाजी गाजलवाड हे अल्पभूधारक आदिवासी शेतकरी असून त्यांनी आपल्या मुलांना राजश्री शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या महामानवाने घालून दिलेला मूलमंत्र आपल्या मुलांना दिला शिका शिकला तरच तुमची प्रगती होऊ शकते हाच ध्यास मनात धरून मुलगा प्रभाकर यांनी हाडाची गिट्टी रक्ताचे डांबर करून दिवस रात्र अभ्यास केला व 2024 25 च्या एम. पी. एस. सी. च्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन महसूल सहाय्यकक हिंगोली गाव या ठिकाणी जॉईन झाला आहे यामुळे कोकले गाव ग्रामस्थ व ग्रामपंचायत कार्यालय कोकलेगाव यांच्या वतीने त्यांच्या आई-वडिलांसह सत्कार करून त्यांना पुढील आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या प्रभाकर यांनी गावकऱ्यांना व शिक्षण घेणाऱ्या तरुण मुला-मुलींना संदेश दिला शिका , अभ्यास करा व्यसनापासून व व्यसन करणाऱ्या मित्रापासून दूर राहा फक्त ध्यास ठेवा की मला यू.पी.एस.सी. पास होऊन क्लास वन अधिकारी बनायचं. आहे अथवा एम.पी.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण होऊन क्लास टू अधिकारी बनायचं आहे यश तुमच्या पायाशी आपोआप लोटांगण घालत तुमच्या पाठीशी येईल जिद्द सोडू नका मेहनत करा व शिक्षणाच्या संधीचा व बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या आरक्षणाचा पुरेपूर फायदा घ्या कारण मी पण कोकलेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षण घेतले आहे, त्यानंतर बिलोली या ठिकाणी माध्यमिक व उच् माध्यमिक शिक्षण घेऊन पीपल्स कॉलेज नांदेड या ठिकाणी शिक्षण पूर्ण केला आहे यामुळे ग्रामीण भागातील मुले सुद्धा यू.पी.एस.सी. एम.पी. एस.सी . उत्तीर्ण होऊन क्लास वन अधिकारी होऊ शकतात.



# मांजरम शिवारात अपघात

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

सुसाट वेगातील बुलेट दुचाकी अनियंत्रित होऊन रस्त्यालगतच्या लोखंडी कठड्याला धडकून पेट घेतल्याची थरारक घटना गडगा–कहाळा रोडवर मांजरमजवळील धोकादायक वळणावर रविवारी सायंकाळी घडली. या भीषण अपघातात बुलेटवरील दोन युवक गंभीर जखमी झाले.

# शिक्षकांवरील मानसिक ताण तात्काळ दूर करा

- ऑनलाईन कामासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची शिक्षक परिषदेची मागणी
- शिक्षकांवर अशैक्षणिक व ऑनलाईन कामांचा मारा -बाबासाहेब बोडखे

> शिक्षकांवर अशैक्षणिक व ऑनलाईन कामांचा मारा होत आहे. या सततच्या ऑनलाईन कामांमुळे शिक्षक अत्यंत मानसिक तणावाखाली अध्यापनाचे कार्य पार पाडत आहेत. परिणामी शिक्षक संवर्गामध्ये मायग्रेन, मधुमेह, उच्च रक्तदाब यांसारख्या आजारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून शिक्षण क्षेत्रात अस्वस्थता व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत शिक्षणातून सुदृढ, निर्भय व सक्षम नागरिक घडविण्याची प्रक्रिया साशंक बनली आहे.
>
> **-बाबासाहेब बोडखे (जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद)**

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

ऑनलाईन कामाच्या अतिरेकामुळे शिक्षकांवर निर्माण झालेला प्रचंड मानसिक ताण तात्काळ संपुष्टात आणण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भातील निवेदन शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा माजी शिक्षक आमदार नागो गाणार यांनी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, शिक्षण सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग तसेच शिक्षण संचालक यांना पाठविले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली. विद्यार्थ्यांना सुजाण, सुसंस्कृत व सुशिक्षित नागरिक घडविण्यासाठी शिक्षकांची नियुक्ती करण्यात येते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक सतत प्रयत्नशील असतो व समाज घडविण्यात त्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मात्र शिक्षक नियुक्तीचा मूळ उद्देश आणि हेतू विचारात न घेता शासन व प्रशासनाकडून शिक्षकांवर सातत्याने विविध अशैक्षणिक कामे लादली जात आहेत, अशी तीव्र भावना या निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

सध्या शाळांमध्ये शिक्षकांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे कार्यरत शिक्षकांवर अध्यापनाचा ताण मोठ्या प्रमाणात आहे.अशा परिस्थितीत अध्यापनाबरोबरच ऑनलाईन अहवाल सादर करणे, विविध लिंक भरणे, छायाचित्रे व व्हिडीओ तयार करणे, विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन लिंकद्वारे अपलोड करणे, प्रत्येक कार्यक्रम, सण, उत्सव, जयंती, पुण्यतिथी, मराठी पंधरवडा, विविध विषय पंधरवडा आदी उपक्रमांचे फोटो, व्हिडीओ, लेखी अहवाल व विद्यार्थ्यांच्या कृतीचे पुरावे ऑनलाईन सादर करण्याचा प्रचंड बोझा शिक्षकांवर टाकण्यात येत आहे.

ही बाब सामाजिकदृष्ट्या अत्यंत गंभीर स्वरूपाची असून यावर तात्काळ उपाययोजना करणे अत्यावश्यक व निकडीचे असल्याचे शिक्षक परिषदेतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. ऑनलाईन कामांसाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून त्याद्वारेच सर्व ऑनलाईन कामाचे नियोजन व अंमलबजावणी करावी.

# मुली व महिलांच्या सुरक्षिततेसाठी दामिनी पथकाची स्थापना करा

## नगरसेविका सौ अनुपमा गायकवाड

- शहरात पोलिसांची गस्त वाढवा

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



> मुली व महिलांची छेड काढणाऱ्यांची, टवाळखोरांची गय केली जाणार नाही. जागरूक नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी आपल्या भागातील विद्यार्थिनींना, महिलांना, कसल्याही प्रकारचा त्रास जर कोणी देत असेल तर पोलीस स्टेशनला प्रत्यक्ष येऊन किंवा मोबाईलद्वारे कळवावे असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक कमल शिंदे यांनी केले आहे.
>
> **- कमल शिंदे, सहाय्यक पो.नि.**

शहरातील विद्यार्थिनी व महिलांच्या सुरक्षितेसाठी दामिनी पथकाची स्थापना करण्यात यावी तसेच दोन आठवडी बाजार व सार्वजनिक ठिकाणे, शहरातील अनेक भागात पोलिसांची गस्त वाढविण्याची मागणी नगर परिषदेच्या नगरसेविका सौ. अनुपमा महेंद्र गायकवाड व नगरसेविका सौ. गोदावरी गंगाधर पुपलवार यांनी एका निवेदनाद्वारे बिलोली पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक कमल शिंदे यांच्याकडे केली आहे.

बिलोली शहर हे तालुक्याचे ठिकाण असल्याने शहरात मोठ्या प्रमाणात महिला व पुरुषांची, विध्यार्थ्यांची, शिक्षणासाठी मुलींची ये-जा असते तसेच शहरात दोन आठवडी बाजार भरतात या आठवडी बाजारात महिलांची संख्या जास्त असते.या दोन्ही बाजारात पोलिसांची गस्त वाढवावी व दोन दिवस पोलीस कर्मचारी नियुक्त करावा जेणे करुन मोबाईल चोरी, दुचाकी चोरी व महिलांची छेड काढणाऱ्यावर वचक बसेल.असे निवेदनात म्हण्टले आहे. शहरातील अनेक भागात चोरीचे प्रमाण वाढले असून चोरांना पोलिसांची भीती राहिली नाही. त्यामुळे चोरीचे प्रमाण वाढले आहे.शहरात व परिसरात शाळा महाविद्यालय असल्याने शिक्षणासाठी मुली शहरातुन व ग्रामीण भागातून प्रमाणात येतात. तसेच सकाळी, संध्याकाळी महिला वॉकिंगसाठी घरातून निघतात त्यामुळे मुली व महिलांच्या सुरक्षित्तेसाठी दामिनी पथकाची स्थापना करण्यात यावी. शहरातील बसस्थानक, सार्वजनिक ठिकाण, शाळा, महाविद्यालय सारख्या ठिकाणी पोलीस गस्त वाढवावी त्यामुळे विदयार्थीनी, महिला सुरक्षित राहतील व चोरीवर आळा बसेल, कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही.असे सौ. गायकवाड व सौ पुपलवार यांनी निवेदनात नमूद केले आहे. पोलीस अधिकाऱ्यानी तात्काळ दामिनी पथकाची स्थापना करून पोलीस गस्त वाढवावी अशी मागणी नगरसेविका सौ. अनुपमा महेंद्र गायकवाड, नगरसेविका सौ. गोदावरी गंगाधर पुपलवार यांनी केली आहे.

# ११ केंद्रांवर बारावी परीक्षा

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यात बारावीची परीक्षा शांततेत व कॉपीमुक्त वातावरणात सुरू असून तालुक्यातील ११ परीक्षा केंद्रांवर एकूण ४५७३ विद्यार्थ्यांपैकी ९७ विद्यार्थी अनुपस्थित राहिल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. लातूर विभागीय परीक्षा मंडळाअंतर्गत नांदेड जिल्ह्यातील ११२ परीक्षा केंद्रांवर एकूण ४३,२६९ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. नायगाव तालुक्यात ओॲसिस इंग्लिश स्कूल कुंटूर, जिल्हा परिषद हायस्कूल कुंटूर, जनता कनिष्ठ महाविद्यालय नायगाव, यमुनाबाई उच्च माध्यमिक विद्यालय नायगाव, दत्त कनिष्ठ महाविद्यालय नायगाव,मास्टर दीनानाथ मंगेशकर विद्यालय सोमठाणा, कुंटूर तांडा, बरबडा, धुप्पा, मरवाळी तांडा व नरसी, या केंद्रांवर परीक्षा सुरू आहे.

# चैतन्य विद्यालयात वृक्षारोपण व वृक्षवाटप

**ओतूर : (समर्थ गांवकरी)**




ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूर या ठिकाणी बी डी एस सोशल इम्पॅक्ट फाउंडेशनचा पुणे यांच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त १५० केशर जातीच्या आब्यांच्या झाडांचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले. तसेच विद्यालयाच्या परिसरात पिंपळ,बकुळा,फायकस,पिस्टल पाम आदी प्रकारची ५० झाडे लावण्यात आली.हा कार्यक्रम ग्राम विकास मंडळ ओतूरचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाल्याची माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. बी डी एस सोशल इम्पॅक्ट फाउंडेशन पुणे चे संस्थापक अध्यक्ष अक्षय बाळासाहेब तांबे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की,या संस्थेच्या माध्यमातून आरोग्य ,शिक्षण, कृषी आणि उपजीविका यांच्या सक्षमीकरणाकरिता काम केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणात प्रती जाणीव जागृती व्हावी याकरता अनेक पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जातात. महिला व आदिवासी विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी प्राधान्याने योगदान व उपक्रम आयोजित केले जातात. शेतीसाठी शेतकऱ्यांना विविध प्रयोगिक मार्गदर्शन व सहाय्य पुरविले जाते.विद्यार्थ्यांनी मिळालेली झाडे आपल्या शेताच्या बांधावर लावून त्याचे संगोपन करावे व पर्यावरण समतोल राखण्यासाठी प्रयत्न करावेत.

विद्यालयाच्या परिसरात ग्राम विकास मंडळ ओतूरचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे,रघूनाथ तांबे,सीताराम ज्ञानदेव तांबे,जालिंदर राजाराम तांबे,रोहिदास बाळासाहेब तांबे यांच्या हस्ते पिंपळ , बकूळा या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी प्रदीप गाढवे,पंकज घोलप ,रामदास तांबे ,सोमनाथ टिकेकर ,डॉक्टर विशाल तांबे,फार्मर फॉर फॉरेस्ट चे संतोष जोरी , राजश्री भालेकर , संजय हिरे ,अनिल उकिरडे ,अजित डांगे , राजाराम शिंदे ,विशाल चौधरी ,लक्ष्मण दुडे उपस्थित होते.

# शिवसेनेच्या स्मिता कणसे यांची बाजी




**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील बेल्हे - राजुरी जिल्हा परिषद गटामध्ये शिवसेनेच्या स्मिता पंकज कणसे यांचा ४४९७ मतांनी विजयाची बाजी मारली आहे. तर बेल्हे व राजुरी पंचायत समिती गणामध्ये शिवसेनेने सत्ता मिळवली आहे. जुन्नर तालुक्याचे लक्ष लागलेल्या बेल्हे राजुरी जिल्हा परिषद गटामध्ये प्रतिष्ठेची लढाई तयार झाली होती.विद्यमान जिल्हा परिषद सदस्या स्नेहल शेळके यांचा पराभव करत स्मिता कणसे यांनी विजय मिळवला.मतदारांनी नवीन महिला सदस्यांची निवड करण्याचं ठरवल्याचं चित्र या मतदारसंघांमध्ये दिसले. तर राजुरी गणामध्ये शिवसेनेचे शांताराम दाते यांचा ३१८७ मतांनी विजयी झाला आहे. त्यांनी राष्ट्रवादीच्या प्रदीप आहेर यांचा पराभव केला. तर बेल्हे गणामध्ये शिवसेनेचे राजेंद्र पिंगट यांचा १४६१ मतांनी विजयी झाला आहे. त्यांनी राष्ट्रवादीच्या पांडुरंग साळवे यांचा पराभव केला. स्मिता कणसे यांचे पती पंकज कणसे यांनी दुष्काळी आणे पठारावरती केलेलं टँकरने पाणी वाटप तसेच तरुणांचा वाढता पाठिंबा यामुळे विजय सहज शक्य झाला असावा. निकालाच्या पहिल्या फेरीपासून स्मिता कणसे यांनी आघाडी घेतली.

# विद्यार्थी स्पर्धेच्या युगात सक्षमपणे उभे राहावेत : मंगेश दाते







> कोणत्याही क्षेत्रातील प्रगती ही सामूहिक प्रयत्नांवर अवलंबून असते. आमदार काशिनाथ दाते सरांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून विकासकामे राबविण्याचा संकल्प आपण सर्वांनी करावा. या उपक्रमामुळे लाभार्थी विद्यार्थी व पालकांमध्ये समाधान व्यक्त होत असून आमदार दाते सरांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.
>
> **- मंगेश दाते, उद्योजक पारनेर**

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

मंगळवार दि. १० फेब्रुवारी २०२६ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विशेष प्रयत्नातून जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाच्या सेस फंडातून जवळे येथील श्री. धर्मनाथ विद्यालयातील १० विद्यार्थ्यांना सायकल वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास आमदार दाते सर यांचे चिरंजीव, श्री. मंगेशशेठ दाते हे प्रमुख उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक सोयी उपलब्ध व्हाव्यात, शाळेत ये–जा करणे सुलभ व्हावे आणि विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास अधिक गतीमान व्हावा, या उद्देशाने ही सायकल वाटप योजना राबविण्यात येत असल्याचे दाते यांनी यावेळी स्पष्ट केले. या कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किसनराव रासकर, रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभाग सल्लागार समन्वयक संदीपराव सालके, संभाजी काका सोमवंशी, प्रदिप सोमवंशी, संतोष सालके, मंगेश सालके, कैलास शेळके, संपतराव सालके, गोपाळे काका, सोनालीताई ढवळे, महेंद्र पठारे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंगेशशेठ दाते म्हणाले की, आमदार काशिनाथ दाते सर हे सातत्याने समाजातील विविध घटकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील असून जवळे गावच्या विकासासाठी त्यांनी नेहमीच झुकते माप दिले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धेच्या युगात सक्षमपणे उभे राहावेत, यासाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यावर आमदार दाते सर यांचा नेहमीच भर राहिला आहे. यावर्षी धर्मनाथ विद्यालयातील मागणी अर्जच मर्यादित होते. त्यामुळे कमी विद्यार्थ्यांना सायकल अनुदानाचा लाभ मिळाला असला, तरी पुढील वर्षी अधिकाधिक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

# शिवजन्मोत्सवनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन



**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

सिडको सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व जिजाऊ ब्रिगेड यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. १९ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ आयोजित विविध स्पर्धांमधील विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमास खा. रविंद्र चव्हाण, आ. आनंद बोढारकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्यासह नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी, माजी नगरसेवक व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दुपारी ३ वाजता ढोल-ताशाच्या गजरात भव्य शिवजन्मोत्सव मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून या मिरवणुकीत सिडको हडको परिसरातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी लेझीम पथकासह सहभागी होणार आहेत. ही मिरवणूक हडको येथील शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून सुरू होऊन क्रांती चौक, संभाजी चौक मार्गे जिजाऊ सृष्टी येथे सायंकाळी ७ वाजता समारोपास येणार आहे. शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने रांगोळी स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा,

निबंध स्पर्धा व लेझीम स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. सामान्य ज्ञान स्पर्धा दि. १५ फेब्रुवारी रोजी जिजाऊ सृष्टी सिडको येथे पार पडली असून लेझीम स्पर्धा व कवायती सादरीकरण दि. १९ फेब्रुवारी रोजी मिरवणुकीदरम्यान करण्यात येणार आहे. दि. २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता जिजाऊ सृष्टी सिडको येथे ह.भ.प. शिव किर्तनकार ज्योतीताई जाधव यांचा प्रबोधनपर शिवकिर्तन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्यमंत्री व खासदार अशोकराव चव्हाण हे असणार असून उद्घाटक म्हणून आ. प्रतापराव पाटील

चिखलीकर उपस्थित राहणार आहेत. विशेष पाहुणे म्हणून खा. रविंद्र चव्हाण, खा. अजित गोपछेडे, शिवसेना गटनेते आ. हेमंत पाटील, आ. आनंदराव पाटील बोढारकर, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, शिवसेना दक्षिण जिल्हाप्रमुख विनय गिरडे यांच्यासह संजय घोगरे, मंगलाताई देशमुख, सुवर्णा सतीश बसवडे, वैजनाथ देशमुख, निरंजनाताई लांडगे आदी मान्यवर उपस्थित राहणार + आहेत. शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजित सर्व स्पर्धा व भव्य मिरवणुकीत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती, मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड व संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य श्रीमंत ढोले यांनी बारावीच्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांना दिल्या शुभेच्छा



**इंदापूर : (समर्थ गांवकरी)**

जय भवानीगड विकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तसेच नवनिर्वाचित काटी लाखेवाडीचे जिल्हा परिषद सदस्य श्रीमंत ढोले यांनी आजपासून सुरू झालेल्या बारावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना यशवंत, गुणवंत व्हा अशा शुभेच्छा दिल्या. आजपासून उच्च माध्यमिक शालांत HSC परीक्षा सुरू होत आहेत, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यास आकार देण्याचा हा अतिशय महत्त्वाचा टप्पा असून सर्वांनी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जावे, ही परीक्षा सर्वांना सोपी जावी व उत्तम गुणप्राप्ती मिळावी. यशस्वी भव!हा शुभेच्छा संदेश संस्थेचे अध्यक्ष या नात्याने दिला. तसेच प्रशालेतील परीक्षेसाठी येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांला लेखणी प्याड,व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले .

परीक्षार्थी विद्यार्थी प्रशालेमध्ये आल्यावर त्यांचे औक्षण करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी अध्यक्ष श्रीमंत ढोले, उपाध्यक्ष चित्रलेखा ढोले, सचिव हर्षवर्धन खाडे, विश्वस्त पृथ्वीराज ढोले, ऋषिकेश ढोले, विद्या निकेतन स्कूल अँण्ड जुनियर कॉलेज लाखेवाडीचे प्राचार्य गणेश पवार, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# जुन्नर तालुका अध्यक्षपदी नयन डुंबरे



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्हा स्तरीय पत्रकार अधिवेशन निघोज येथील जागतिक पर्यटन स्थळ असलेले रांजणखळगे येथील मळगंगा देवस्थानच्या सभागृहात अत्यंत उत्साहात व थाटामाटात संपन्न झाले या अधिवेशनात जुन्नर तालुका अध्यक्ष पदाची घोषणा संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गावकरीचे मुख्य संपादक डॉ.विश्वासराव आरोटे यांनी केली आणि नयन डुंबरे यांना जुन्नर तालुकाध्यक्ष म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र भोर व माजी तालुकाध्यक्ष राजेश डोके यांच्या उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले.यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष नयन डुंबरे,पुणे जिल्हा उपाध्यक्ष व माजी तालुकाध्यक्ष राजेश डोके यांचा आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार यांच्या शुभहस्ते शाल,श्रीफळ, व ट्रॉफी देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी जुन्नर तालुका संपर्क प्रमुख यांनी देखील नयन डुंबरे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी व्यासपीठावर आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार,राष्ट्र सह्याद्रीचे संपादक शिवाजीराव शिर्के,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे महासचिव डॉ.विश्वास राव आरोटे,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कार्याध्यक्ष वसंतराव कवाद,उपाध्यक्ष अमृता रसाळ,शिवसेना जिल्हाध्यक्ष डी.शिरोळे,निघोज माजी सरपंच तूकारामजी लंके, कन्हैया उद्योग समूहाचे मच्छिंद्र लंके,राष्ट्रवादी कॉंग्रेस नेते सोमनाथ वरखडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. तसेच पत्रकारांच्या विविध प्रश्नावर सखोल चर्चा झाली.

# जिल्हा परिषद ठाणे राज्यात तृतीय क्रमांक

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील विविध शासकीय कार्यालयांच्या कामकाजाचे मूल्यमापन करण्यात आले असून, जिल्हा परिषद ठाणे यांनी राज्यात तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हा परिषद ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संपूर्ण अधिकारी-कर्मचारी वर्गाचे अभिनंदन केले आहे. लवकरच राज्य शासनातर्फे सर्व विजेत्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

# ह.भ.प. कारभारी दगडू गोर्डे यांचे निधन; मान्यवरांची गोर्डे कुटुंबीयांना सांत्वन भेट



**(समर्थ गांवकरी)**

डि. के. गोर्डे (संचालक, ग्राम सुरक्षा यंत्रणा, महाराष्ट्र राज्य) यांचे वडील ह.भ.प. वै. कारभारी दगडू गोर्डे यांचे ३ फेब्रुवारी रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे. गोर्डे कुटुंबाच्या दुःखात सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रातील दानशूर व्यक्तिमत्त्व समाजभूषण सन्माननीय नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्यासह इतर मान्यवरांनी पिंपळगाव निपाणी (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) येथील त्यांच्या राहत्या घरी भेट देऊन सांत्वन केले. यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधत दुःखात धीर दिला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत, “मुला-मुलींना उत्तम शिक्षण द्या, त्यांना सक्षम करा आणि घर सुशिक्षित बनवा, हीच दिवंगतांना खरी श्रद्धांजली ठरेल,” असा संदेश दिला.

कारभारी दगडू गोर्डे यांच्या निधनामुळे सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणारे व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. परिसरातील नागरिक, नातेवाईक आणि मान्यवरांनी त्यांच्या स्मृतींना श्रद्धांजली अर्पण केली.

# बी डी टी सोशल इम्पॅक्ट फाउंडेशन पुणे यांच्या माध्यमातून चैतन्य विद्यालयात वृक्षारोपण व वृक्षवाटप




**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूर या ठिकाणी बी डी टी सोशल इम्पॅक्ट फाउंडेशनचा पुणे यांच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त १५० केशर जातीच्या आब्यांच्या झाडांचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले. तसेच विद्यालयाच्या परिसरात पिंपळ , बकुळा,फायकस,पिस्टल पाम आदी प्रकारची ५० झाडे लावण्यात आली.हा कार्यक्रम ग्राम विकास मंडळ ओतूरचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाल्याची माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. बी डी टी सोशल इम्पॅक्ट फाउंडेशन पुणे चे संस्थापक अध्यक्ष अक्षय बाळासाहेब तांबे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की,या संस्थेच्या माध्यमातून आरोग्य,शिक्षण,कृषी आणि उपजीविका यांच्या सक्षमीकरणाकरिता काम केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणा प्रती जाणीव जागृती व्हावी याकरता अनेक पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जातात. महिला व आदिवासी विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी प्राधान्याने योगदान व उपक्रम आयोजित केले जातात. शेतीसाठी शेतकऱ्यांना विविध प्रयोगिक मार्गदर्शन व सहाय्य पुरविले जाते.विद्यार्थ्यांनी मिळालेली झाडे आपल्या शेताच्या बांधावर लावून त्याचे संगोपन करावे व पर्यावरण समतोल राखण्यासाठी प्रयत्न करावेत. विद्यालयाच्या परिसरात ग्राम विकास मंडळ ओतूरचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे,राजेंद्र डुंबरे, रघूनाथ तांबे,सीताराम तांबे, जालिंदर तांबे,रोहिदास तांबे यांच्या हस्ते पिंपळ,बकूळा या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.याप्रसंगी प्रदीप गाढवे, पंकज घोलप,रामदास तांबे, सोमनाथ टिकेकर,डॉक्टर विशाल तांबे,फार्मर फॉर फॉरेस्ट चे संतोष जोरी,राजश्री भालेकर संजय हिरे,अनिल उकिरडे, अजित डांगे,राजाराम शिंदे , विशाल चौधरी,लक्ष्मण दुडे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद खेत्री यांनी केले.आभार भाऊसाहेब खाडे यांनी मानले .

# तरूण खन्ना महादेवांची भूमिका साकारणार!

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



एण्ड टीव्ही आगामी दिव्य ड्रॅमेडी ‘हे भगवान - कितना बदल गया इन्सान!सह हलके-फुलके व निखळ मनोरंजन सादर करण्याप्रती आपले वचन अधिक दृढ करण्यास सज्ज आहे. उज्जैनच्या आध्यात्मिक पार्श्वभूमीवर आधारित या मालिकेमध्ये जीवनाचे सार दाखवणारे विनोद, भावनिक कथानक आणि काहीसा पौराणिक ट्विस्ट आहे. या अद्वितीय कथानकामध्ये मोहकतेची भर करत आहेत दिग्गज अभिनेता तरूण खन्ना, जे सखोलता व दिव्यतेसह पौराणिक भूमिका साकारण्यासाठी प्रसिद्ध आहेत. ते या नवीन मालिकेमध्ये महादेवांची प्रबळ व वंदनीय भूमिका साकारणार आहेत.

# वाळवंडा येथे बालमेळावा उत्साहात पार पडला




**पालघर : (समर्थ गांवकरी)**

जव्हार: तालुक्यातील वाळवंडा येथे बालकांच्या आनंद, शिक्षण आणि सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आलेला बालमेळावा उत्साहात पार पडला. या बालमेळाव्याचे आयोजन बॉस्को सामाजिक विकास संस्था, वाळवंडा यांच्या वतीने करण्यात आले होते. या बालमेळाव्यात जव्हार-मोखाडा तालुक्यातील विविध शाळांमधील हजारो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. मुलांसाठी खेळ, बौद्धिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच मनोरंजनात्मक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. येथे मुलांनी नृत्य, गीते, नाटिका आणि विविध कला सादरीकरणातून मुलांनी आपले कलागुण दाखवून दिले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून फादर जरसीलन, जव्हार तालुका प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक विजय मुर्तडक, बॉस्को सामाजिक विकास संस्थेचे डायरेक्टर फादर जेसू रॉबिन्सन,ITI Principal फादर मॉन्टी,BSVS चे ॲडमिनिस्टेटर ब्रदर साविओ, अकाउंटन व्हॅलेरियन,माजी सरपंच रमेश दांडेकर, माजी उपसरपंच बच्चू फडवळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढल्याचे दिसून आले. ग्रामीण भागातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.



# इंदापूर येथे स्व.अजित दादांना भावपूर्ण आदरांजली!

**इंदापूर: (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा परिषद व इंदापूर पंचायत समिती निवडणुकीतील राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या ऐतिहासिक विजयाबद्दल उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस इंदापूर येथे जुन्या मार्केट कमिटीच्या आवारात भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. तसेच यावेळी कर्मयोगी शंकररावजी पाटील यांच्या अर्ध पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, आप्पासाहेब जगदाळे, मधुकर भरणे आदी मान्यवरांसह राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# इंटरनॅशनल यंग शेफ ऑलिम्पियाड २०२६मध्ये अल्बानियाची मोहर

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट (IIHM) संस्थेचे जागतिक मुख्यालय असलेल्या कोलकत्ता येते १२ व्या IIHM इंटरनॅशनल यंग शेफ ऑलिम्पियाड (YCO) २०२६ चा भव्य समारोप पार पडला. जगभरातील तरुण शेफ्सच्या सर्वात मोठ्या आणि प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे यंदाचे पर्व कोलकात्यात यशस्वीरीत्या पूर्ण झाले.

जगातील सर्वात मोठ्या विद्यार्थी शेफ्सच्या मंचावर, कोलकात्याशी भावनिक नाते असलेल्या मदर तेरेसांच्या जन्मदेशातून आलेल्या अल्बानियाच्या तरुण शेफने इतिहास घडवला. इन्स्टिट्यूटी कुलिनारी नेरान्झी येथील एन्री क्युडारी याने सुवर्ण चषक उंचावत सुवर्ण मुकुट परिधान केले आणि जागतिक विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत जगातील सर्वाधिक तरुण शेफ्स सहभागी झाले होते.

तसेच या मालिकेमध्ये इंग्लंड दुसऱ्या क्रमांकावर राहिला. वेस्टमिन्स्टर कॅपिटल सिटी कॉलेज येथील डॉमिनिक थॉमस ग्रंडी याला रौप्य चषक प्रदान करण्यात आले. श्रीलंका तिसऱ्या क्रमांकावर राहिला. कोलंबो अकॅडमी ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट येथील विदानागामागे रुमिरा रेशान पियासिरी याने कांस्य चषक पटकावला. पुण्यात झालेल्या ऑलिम्पियाडच्या पहिल्या फेरीतील दमदार कामगिरीमुळे त्याचा अंतिम फेरीपर्यंतचा प्रवास अधिक भक्कम ठरला.

जगप्रसिद्ध पाककला परंपरा लाभलेल्या फ्रान्सच्या मेलिस हेलिन पॅरॉट हिने प्लेट ट्रॉफी जिंकली. डॉ. सुबोर्णो बोस चॅलेंज ट्रॉफी, दोन देशांतील शेफ्सना एकत्र येऊन एकच पदार्थ तयार करण्याची संधी देणाऱ्या आणि पाककलेचे माध्यमातून एकतेचा संदेश देणाऱ्या भावस्पर्शी स्पर्धेत, उझबेकिस्तानचा ओझोदबेक ओदिलॉव आणि तिमोर-लेस्तेचा मेलक्विरुडी लेकी-बेरे दा कुन्हा यांनी विजेतेपद पटकावले.

कोलकात्याच्या स्वच्छ रात्रीच्या आकाशाखाली, भावना, शिस्त आणि साकार झालेल्या स्वप्नांनी भारलेल्या क्षणांत सर्व स्पर्धकांनी यशाच्या शिखरावर झेप घेतली. ते केवळ विजेते म्हणून नव्हे, तर जागतिक पाककला नेतृत्वाच्या नव्या पिढीचे प्रतिनिधी म्हणून उभे राहिले. जगातील सर्वाधिक सहयोगात्मक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध पाककला स्पर्धा म्हणून ओळख मिळवलेल्या या स्पर्धेत प्रत्येक विजेता आपल्या यशाचा खरा हकदार ठरला.

अंतिम स्पर्धात्मक फेऱ्या कोलकत्ता येथील इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट (IIHM) ग्लोबल कॅम्पसमध्ये पार पडली. त्यानंतर निक्को पार्क संकुलातील वेट-ओ-वाइल्ड येथे भव्य समारंभ आणि पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. संगीत, नृत्य आणि उत्सवाच्या वातावरणात जगातील सर्वात मोठ्या विद्यार्थी शेफ्स स्पर्धेचा समारोप झाला.

यंग शेफ ऑलिम्पियाड (YCO) २०२६ चा पडदा पडताना ही स्पर्धा केवळ स्पर्धा न राहता, एक जागतिक ज्ञान आणि शिक्षण परिसंस्था म्हणून पुढे आली. तंत्रज्ञान, नैतिकता, शाश्वतता आणि मानवी सर्जनशीलतेचा सुंदर संगम या मंचावर अनुभवता आली. “आर्टीफिशीअल इंटेलिजन्स (AI) च्या माध्यमातून जागतिक पाककला वारसा जतन करणे” ही संकल्पना स्वयंपाकघरांपासून चर्चांपर्यंत आणि विविध संस्कृतींमध्ये प्रत्यक्षात साकार झाली. या ऑलिम्पियाडच्या दृष्टीकोनावर बोलताना इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट (IIHM) चे संस्थापक-अध्यक्ष आणि यंग शेफ ऑलिम्पियाड (YCO) चे मुख्य मार्गदर्शक डॉ. सुबोर्णो बोस म्हणाले, “तुम्ही वेगवेगळ्या खंडांतून, संस्कृतींतून, हवामानांतून आणि खाद्यपरंपरांतून येथे आला होतात; मात्र तुम्ही एका मंचावर उभे राहिलात—एका समान भाषेने एकत्र आलेले, आणि ती भाषा म्हणजेच अन्न.”